## प्रकरण 4 थे

## रानकवी यशवंत तांदळे यांची कविता

आतापर्यंत आपण मराठी कवितेचा प्रपंच कसकसा विस्तारत गेला याचा धावता आढावा घेतला. तिच्यातील वृत्ती-प्रवृत्तींचा शोधही घेतला. त्यावेळी अनेक कवीच्या कतृत्वाचे दर्शन घडले. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाचे वेगळेपण लक्षात आले. अशा या ग्रामीण कवितेतही क्वचितच पहावयास मिळणारे मेंढपाळाचे मनोगत कवी यशवंत तांदळे यांनी आपल्या लोकधाटीने रंगविले आहे. त्यांच्या या वेगळया भावविश्वाचे स्वरुप आपणाला समजावून घ्यावयाचे आहे.

रानकवी यशवंत तांदळे यांनी विपुल काव्यलेखन केलेले दिसते. त्यांनी आपल्या एका मुलाखतीतच म्हटले आहे की -

"आजपर्यंत मी किती कविता केल्या त्यांचा अंदाज नाही. अमाप कविता झाल्या असतील व त्या प्रसिद्ध व्हाव्यात अशी माझी अपेक्षाही नव्हती"[1].

उत्स्फुर्तपणे कविता करायची. ती एखाद्याला गावून दाखवावयाची. एवढेच त्यांना माहिती होते. ऐकणारे श्रोतेही धनगर गडी. कधी कोणी सुशिक्षित रसिक भेटलाच तर व त्याने लिहून घेतली तर घेतली नाही तर ती तशीच हवेत विरुन जायची. कविता छापून प्रसिद्ध करावयाची असते हेही रानावनातून कविता करणाऱ्या कवीला माहिती नसावे, असे म्हणता येते. यशवंताच्या घरच्या बायका मुलांनाही त्यांची आवड नव्हती. मुल शाळेत जात होती. परंतु त्यांनाही कविता ऐकण्यात स्वारस्य वाटत नव्हते. हे वरील मुलाखतीतच त्यांनी स्पष्ट केलेले आहे.[2]

रानकवीचा चाहता वर्गही मर्यादितच होता. कराडच्या साहित्य संमेलनात त्यांना जशी 'रानकवी' ही उपाधी मिळाली. तशीच अमाप प्रसिद्धी ही मिळाली त्यानंतर काही रसिकांनीच त्यांची कविता संग्रहित करण्याची योजनाही आखली होती, असे त्यांच्या मुलाखतकार राष्ट्रशक्तीच्या वार्ताहरांनी म्हटल्यावरुन स्पष्ट होते. मात्र ती योजना कागदावरच राहिलेली आहे. या बाबतीत पुण्या-मुंबईच्या आकाशवाणीने उदासीनता दाखविल्याची खंत रानकवीने आपल्या मुलाखतीतच व्यक्त केली आहे. मुलाखतकाराने "आकाशवाणीवर कार्यक्रम

का करीत नाही?" असे विचारताच तांदळे सांगतात,

"आकाशवाणीवर जायचं म्हटल तर आडनाव कुलकर्णी न्हाय तर देशपांडे पायजे. आणि नोकरी धंदा पायजे म्हटल तर आडनांव कांबळे पायजे. मग आमी ह्येच्यात कुठच बसत न्हाय. तवा तेच्या पाठीमागं लागलो न्हाय।"[3]

रसिक मित्रजन असो वा आकाशवाणी असो ह्यांच्यापैकी कोणीही या रानदट सुरावटीच्या कवीची कविता संग्रहित केलेली नाही. ती केली असती तर मराठी काव्यसृष्टीत मोलाची भर पडली असती इतकेच।

रानकवीचे रसिक चाहते श्री.बाळ कालेकर, कन्हैया कुंदप, प्रा.तुकाराम पाटील, श्री.रघुराज मेटकरी, श्री.डी.आर.माने यांच्याकडे मला ज्या कविता उपलब्ध झाल्या त्या संख्येने अल्प असल्या तरी त्या वैविध्यपूर्ण आहेत. तसेच या कविता ध्वनिफितीवरून उतरुन काढलेल्या असल्याने त्या अस्सल स्वरुपातील कविमुखातून जशा बाहेर पडल्या तशाच त्या उतरून काढल्या आहेत.

या कविताचे स्वरुप खालील वर्गवारीने स्पष्ट व्हावे. रानकवींच्या कवीतांचे स्थूलमानाने -

1) यशवंत तांदळे यांच्या कवितेतील समाजदर्शन

2) यशवंत तांदळे यांच्या कवितेतील ग्रामीण संस्कृतीचे दर्शन

3) यशवंत तांदळे यांच्या कवितेतील निसर्ग

4) यशवंत तांदळे यांच्या कवितेतील राजकीय दर्शन

5) यशवंत तांदळे यांच्या कवितेतील व्यक्तिविषयक दर्शन

6) यशवंत तांदळे यांच्या कवितेतील उपहास व उपरोधाचे दर्शन

7) यशवंत तांदळे यांच्या कूट रचना.

असे वर्गीकरण करता येते त्यापैकी 'चारी सबाद सारखं' ही त्यांची पहिली कविता होय. नंतरच्या 35 वर्षातील कविता शोधण्याचे माझे काम चालू आहे.

**यशवंत तांदळे यांच्या कवितेतील समाजदर्शन**

रानकवी यशवंत तांदळे यांची सामाजिक कविता ही त्यांच्या उपलब्ध कवितेतील संख्येने अधिक असणारी कविता होय. या कवितामधून त्यांनी सामाजिक जीवनातील वेगवेगळया रुढी, परंपरा, समाजातील वास्तव,

सामाजिक बदल, समाजातील व्यसनाधिनत्वे द्रारिद्रयाचे, महागाई, कुटुंब नियोजन असे विविध विषय त्यांनी आपल्या कवितेतून चित्रित केलेले आहेत. असा हा संपूर्ण समाज व त्यातील लोकतत्व आपल्याला या कवितेतून प्रत्ययाला येतात. ते सामाजिक चित्र पुढील कवितातून पहावयास मिळते.

'फॅशनवाला' या कवितेत समाजाला लागलेली फॅशनची कीड आणि तिचे वेड याचे चित्रण आले आहे. या कवितेत जास्तीतजास्त तरुणांच्या फॅशनच्या वेडाचे चित्रण झाले आहे. डोक्यावर जास्त केस वाढवून हे तरूण फिरत असतात आणि त्यामुळे खोबरेल तेल महाग झाले. तरूणांच्यातील मर्दपणा नाहीसा झाला. हा मर्दपणा ज्या मिशीवर सिद्ध होतो. ती ओठावरची मिशीच आता नाहीशी झाली. त्याचे स्वरूपच बदलले. चप्पल जाऊन बूट आला. विजार जाऊन बेलबॉटमची पँट आली. अंगावर रंगीबेरंगी कपडे आले परंतु खिसा मात्र रिकामाच राहिला. फॅशनच्या वेडात त्याचे घराकडे दुर्लक्ष झाले. विविध व्यसनाच्या आहारी जावून त्याच्या जीवनाची विल्हेवाट लागली.

"फॅशनन दिसतो गडी चकोट,
पण लागलीय त्येची वाट"[4]

ही जाणीव या कवितेतून प्रत्ययाला आली आहे.

'फॅशनवाला' या कवितेत कवीला हे सुचवावयाचे आहे की, फॅशन म्हणजे सर्व काही नकली आहे. तरूण हा कसा असावयास हवा तर त्याच्यामध्ये मर्दपणा पाहिजे. दुसऱ्याने ज्या प्रकारचे कपडे घातलेले आहेत तशा प्रकारचे आपणही कपडे वापरावेत परंतु ते कपडे आपणाला शोभून दिसतात का याचा विचार ते करीत नाही. पुरुषाचा मर्दपणा हा त्याच्या मिशीवरून दिसून येतो. परंतु त्याने ओठावरची मिशीच काढून टाकली. त्यामुळे तो बायकी वाटायला लागला आहे. दुसऱ्याने व्यसन केले, चैन केली, त्याप्रमाणे आपणही चैन करावी अशी त्याची ईच्छा होते. परंतु यासाठी पैशाची आवश्यकता असते. खिशामध्ये पैसा असावयाला पाहिजे. मात्र खिसा रिकामाच असतो. कारण पैसा मिळविण्यासाठी कष्ट करण्याची तयारी पाहिजे. परंतु या फॅशनमुळे कष्ट करण्याची तयारी राहिली नाही. फॅशन करणारे लोक व्यसनाच्या आहारी जातात. त्यामुळे त्यांच्या जीवनाची विल्हेवाट लागते. तरी तरुणांनी मर्दपणाने जीवन जगावे व व्यसनाच्या आहारी जावू नये असेच कवीला सूचवायचे आहे.

'व्यसनी स्त्रियांना संदेश' या कवितेत कवीने साऱ्या स्त्रियांना विनंती केली आहे की, सर्व स्त्रियांनी तपकीर, मिश्री, चहा यासारखी व्यसने सोडून टाकावी. कारण ही सर्व व्यसने संसाराचा नाश करतात. यातूनच टी.बी. व कॅन्सरसारखे आजार उद्‌भवतात आणि डॉक्टरांच्या खर्चापोटी संपूर्ण संसारच उध्वस्त होतो. म्हणून कवी स्त्रियांना विनंती करतो,

"आयाभहिणीनो विनंती माझी ऐका
मिश्री, तपकीर, चहा सोडून टाका
फुकट डॉक्टराची धन करु नका,
टी.बी. कॅन्सरचा होतूया धोका"[5]

म्हणून स्त्रियांनी व्यसन करु नये असा विनंतीपूर्वक सल्ला कवीने दिला आहे.

आज आपणास हे पहावयास मिळते की, अनेक माणसे व्यसनाधीन झालेली आहेत. मात्र प्रत्येक व्यसनापासून माणसांना कोणता ना कोणता आजार होताच. परंतु तो आजार लगेच दिसून येत नाही. माणसे ज्याप्रमाणे व्यसन करतात त्याप्रमाणे स्त्रियाही व्यसन करतात. त्यामुळे जीवीताला धोका निर्माण होतो. वेगवेगळे आजार उद्‌भवतात तरी व्यसने करु नयेत असे कवीला सांगावयाचे आहे.

"दुष्काळातील बायकांचे हाल" या दिर्घस्वरुपी कवितेत नैसर्गिक आपत्तीतून स्त्रियांच्या होणाऱ्या हालाचे चित्रण कवीने केले आहे. या कवितेला एका लोकगीताची चाल आहे. दुष्काळामध्ये घरंदाज घराण्यातील स्त्रिया दुष्काळी कामावर जाऊन अधिकाऱ्याच्या अधिकारात राहिल्याने घडणाऱ्या घटनांचे चित्रण कवीने केले आहे. दुष्काळाचे संपूर्ण वर्ष आपण हाल वनवासात काढले. चपाती आणि कालवणाला तेलही आपणाला मिळाले नाही. हे त्यांच्या मनाच्या दुःखाचे वर्णन या कवितेत आहे. विहिरीतील पाणी आटून गेले आहे. गुराढोरांच्यावर अवकळा पसरलेली आहे. पावसाच्या अपकृपेने हे सर्व माझ्या वाटयाला आले आहे. स्वतःच्या घरात आपल्या नवऱ्याचे आपण कधी बोलून घेतले नाही. परंतु कामावरचे अधिकारी मात्र कसेही बोलतात. असा हा वाईट प्रसंग आपल्या वाटयाला आला. सकाळच्यावेळी कामाला जाणे, राबराब राबणे, मात्र वेळच्यावेळी पगार न होणे, . रेशनचे कुजके धान्य आपणाला खावयास लागणे. याचेही तिला दुःख होते. घरच

कारभारी टिकाव, खोरी व खांद्यावर पाटया घेऊन जातो. डोक्यावर भाकरी, कडेवर तान्हे मूल घेऊन ही स्त्री कामाला जाते. बडया पाटलाच्या घरची ही सुन आहे. परंतु अशा भयानक दुष्काळामुळेच ही अवकळा माझ्या नशीबाला आली हे खालील कविता रचनेतून पहावयास मिळते,

"बडया घरची सून
आहे मी ग पाटलाची.
बारी आली माझ्यावरती,
दुष्काळी कामाची".[6]

अशा संकटात खचून जाता उपयोगी नाही, तर येणाऱ्या संकटाला सामोरे गेले पाहिजे. हा संदेश कवी देतो व भविष्याला आपल्या वाटयाला चांगले दिवस येतील असा आशावाद कवी या कवितेत बोलून दाखवतो.

सारांश दुष्काळ पडल्यामुळे शेतात पीक आले नाही जनावरांना चारा मिळाला नाही. पाणी नाही. ज्यावेळी दुष्काळ पडला नव्हता त्यावेळी सर्व काही व्यवस्थित होते. धान्य, चारा, पाणी हे पुष्कळ होते. सर्वजण सुखासमाधानाने जीवन जगत होते. बडया घरच्या स्त्रिया कधीही घराच्या बाहेर जात नव्हत्या, पण त्यांनाही रस्त्यावरील दुष्काळी कामावर जावे लागले. एकूण पाहता सर्वांचीच अवस्था बिकट झालेली होती. घरच्या घरधन्याने एवढे जास्त कधी काम केले नव्हते. परंतु त्यालाही काम करावे लागले. ज्या लोकांनी आपल्या शेतामध्ये मोत्यासारखे धान्य पिकविले होते त्याच लोकांना आज रेशन कार्डावर नासके कुजके धान्य खावे लागत आहे. ही खंत स्त्रियांनी आपल्या कारभाऱ्याबद्दलची व्यक्त केली आहे. ज्या स्त्रियांची लहानमुले घराच्या बाहेर आली नव्हती, ज्यांना घराच्या बाहेरचा वारा माहीत नव्हता, पाळण्याशिवाय झोपत नव्हती, त्या स्त्रियांच्या मुलांना झाडाच्या सावलीचा आसरा घेतला व पाळण्याऐवजी झोळीत ठेवण्याची वेळ आली. एवढे करूनही त्यांनी वेळच्यावेळी पगार दिला जात नव्हता. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली होती हे दुःख स्त्रियांना असह्य होत होते. परंतु त्यांचा नाईलाज होता. तरीही त्यांना आशा होती की आपल्या नशिबाला पुढे चांगले दिवस येतील. या आशेवरच स्त्रिया दुष्काळामध्ये जीवन जगत होत्या व हाल सोसत

होत्या. असे दुष्काळातील स्थितीचे स्त्रियांच्या झालेल्या हालाखीचे वर्णन केलेले आहे.

'महागाई' या सामाजिक कवितेचा विचार करीत असताना, विनोदी पद्धतीने महागाईच्या भयानकतेचे चित्रण कवीने केले आहे. आणीबाणी उठताच देशात जी भयानक महागाई वाढली व त्याचे परिणाम लोकांना भोगावे लागले या महागाईपोटीच दाढी वाढली. त्यामुळे चेहऱ्यावर अवकळा आली, शरीरावर कपडाही धड उरला नाही. ठिगळा- ठिगळाची कपडे वापरावी लागली. ही सारी अवस्था . महागाईमुळे झाली, असे कवीने खालील ओळीतून व्यक्त केले आहे.

"एकानं विचारल दाढी का वाढली ?
दुसऱ्यानं विचारल बॉडी का फाटली ?
तिसऱ्यानं विचारल ठिगळं का जोडली ?
काय सांगू दादा. ही महागाई वाढली ।"[7]

तसेच शेतकऱ्याच्या मालाला किंमत नाही. खताचे दर मात्र वाढले. मसाल्याच्या पदार्थात वाढ झाली, घरातील दिव्याला तेलही मिळेनासे झाले. यामुळे दीनदुबळयांना अवकळा प्राप्त झाली. काळया बाजाराला ऊत आला, गल्ली बोळातून सट्टेबाजार चालू लागले. गोरगरिबांच्या पोटाला पुरेसे अन्नही मिळत नव्हते म्हणून काही वेळा चहावरच दिवस काढावे लागले. गोरगरिबांची अब्रू चव्हाटयावर आली. हॉटेलवाल्यांनी आपल्या पदार्थांचे दर वाढविले. दारूचेही दर वाढविल्यामुळे काही लोकांनी दारू पिण्याचे बंद केले. असे हे महागाईने आक्राळविक्राळ रूप धारण केले होते. यातूनच गोरगरिबांची झालेली अवकळा कवीने व्यक्त केली आहे.

आणीबाणी होती तोपर्यंत सर्वच बाबीवर नियंत्रण होते. परंतु आणीबाणी उठताच कोणत्याच बाबीवर नियंत्रण नाहिले नाही. सर्व मालाचे दर वाढले. कोणत्या मालावर किती दर वाढवावा याचे बंधनच राहिले नाही. व्यापारी लोकांनी सर्व मालाचे दर वाढविले, परंतु शेतकऱ्याच्या मालाला किंमत मिळायला पाहिजे होती ती मिळाली नाही . म्हणजेच येथे शेतकरी व व्यापारी यामध्ये विरोधाभास पहावयास मिळतो. दाढी करण्याचा जो दर होता तोही वाढला त्यामुळे काही लोकांनी दाढी करण्याचे सोडून दिले. दारूच्या किमती वाढल्यामुळे काही, लोकांनी दारू पिण्याचे सोडून दिले. त्यामुळे ही एक चांगली गोष्ट झाली असे कवीला वाटते.

म्हणजेच महागाईवरती नियंत्रण पाहिजे होते. गोरगरिबांना जगता यावे. यासाठी महागाई कमी व्हावी. यावरती कोणाचे ना कोणाचे तरी नियंत्रण असावयास पाहिजे तरच सर्व लोक व्यवस्थित जीवन जगतील असे कवीला म्हणावयाचे आहे.

'नवं दिवस' ही छोटेखानी कविता आहे या कवितेत कवीने यंत्रयुगाचा आणि मानवतेचा संदेश दिलेला आहे. हे 'नवं दिवस' गांधीजीच्या संदेशाप्रमाणे सर्व मानवतेने जीवन , जगतील, जातीभेद नाहीसा होऊन एका विहिरीवर सारेजण पाणी भरतील . सर्वजण एकेठिकाणी येऊन जेवण करतील हे 'नवं दिवस' मानवतेच्या संदेशानेहे स्वातंत्र्य अबाधित ठेवतील. असा महत्वाचा विश्वास कवीने या कवितेत चित्रित केला आहे.

जातीभेद सोडून द्यावा पार ।
आमी भरतो पानी एका हिरीवर
एका जागी सगळीजण जेवणारं
नवं दिवस जनतेला दावणार
मिळलं स्वातंत्र्य टिकवून ठेवणार ।। [8]

'नवं दिवस' या कवितेत जनहिताचे कल्याण व्हावे असा विचार मांडलेला आहे. यंत्रयुगामध्ये माणसाची प्रगती झाली परंतु समाजातील जातीयता नाहीसी झाली नाही. सर्वांना समान वागणूक मिळाली नाही. सर्वधर्मसमभाव' ही भावना लोकांच्या मनात निर्माण झाला नाही. या गोष्टी केल्या तर आपले स्वातंत्र्य अबाधित राहील व सर्वांना चांगले दिवस येतील. महात्मा गांधीनी जे सांगितले तेच कवीने सांगितले आहे. थोडक्यात सर्व समाजामध्ये एकतेची व समानतेची भावना राहिली पाहिजे असा निष्कर्ष या कवितेतून निघतो.

'दारू पेनाराचं हाल ' ही यशवंत तांदळे यांची एक सामाजिक कविता होय. या कवितेत दारू पिणाऱ्याच्या उध्वस्त संसाराचे चित्रण कवीने केली आहे. कवी सुरूवातीस म्हणतो की, दारू पीत असताना आनंद वाटतो. परंतु दारू प्याल्यामुळे अंगाला वस्त्र मिळत नाही. या व्यसनामुळे टी.बी. सारखा आजार जडतो. आणि सुखी कुटूंब उध्वस्त होण्यास सुरूवात होते. घरात रोजच मारामारी होते . दारू पिणारी माणसे रस्त्यावर पडतात कपडयातच विष्टा करतात उलटया होऊन अवकळा येते म्हणून सरकारने त्याच्यावर बंदी

घालावी. बंदी घातली. तरीही लाचखाऊ पोलीस वृत्तीमुळे गल्लीबोळातून हे दारूचे गुत्ते चालू राहिले म्हणून कवी स्वतःची शपथ घालतो व दारू पिऊ नका असा समाज परिवर्तनाचा विचार बोलून दाखवितो.

"आज शपथ सगळयांना घातली

सोडा लवकर दारूची बाटली"[9]

आजरोजी बरीच माणसे दारू पीत आहेत. त्यामुळे त्यांच्या संसाराची वाताहत होत चाललेली आहे. वास्तविक पाहता दारू पिण्यास सरकारने बंदी घातलेली आहे तरीही पोलीस खाते इकडे लक्ष देत नाहीत पोलीस खाते या दारूवाल्याकडून हप्ते घेतात. दारू धंदेवाल्यांना गल्लीबोळातून दारूचे अड्डे चालवावयास परवानगी देतात. ही वृत्ती बरोबर नाही. म्हणजेच पोलीसखाते आपले कर्तव्य व्यवस्थितपणे पार पाडत नाही. जर दारूवरती बंदी घातली व पोलीसांनी आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडले तर समाजातील लोकांचे संसार उध्वस्त होणार नाहीत. सर्व सुखी राहातील असाच निष्कर्ष या कवितेतून दिसून येतो.

'कुटुंब नियोजन' रानकवी यशवंत तांदळे यांच्या कवितेतील ही एक महत्वाची कविता होय. या कवितेत कुटुंबनियोजनाचे फायदे बोलून दाखविले आहेत. कुटुंबनियोजनाचा कायदा सरकारने काढला आहे. त्याचा फायदा गोरगरिबांनी घ्यायला हवा. केवळ हट्टापोटी ही माणसाची पिलावळ वाढविण्यात अर्थ नाही. हा विचार कवी या कवितेतून मांडतो. दोन किंवा तीनच मुले पुरेत. संतती बंदी केल्याशिवाय सौख्य नाही. आठ-दहा पोरांचा संसार म्हणजे दारिद्रयाला आमंत्रणच होय. आणि त्यामुळे कुटुंबाची बिकट अवस्था होते. लोकसंख्येच्या वाढीमुळे अन्न, वस्त्र व निवारा या तीनीही मूलभूत गरजांना लोक मुकतात. कुटुंबनियोजन करावे असे कवी सर्वांना खालील आळीतून संदेश देतो.

संतती बंदी केल्याशिवाय,

सुख आपल्याला मिळणार नाय,

दुसऱ्यान सांगितल्यालं एकायच नाय

वरसाला पाळणा हालवायचा नाय [10]

सारांश आज आपल्या देशाची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. त्यामुळे सरकारपुढे लोकसंख्येचा

अनेक समस्या निर्माण झाल्याआहेत. ' छोटे कुटुंब, सुखी कुटुंब' हा माणसाने आपल्या मनाचा निश्चय करावा. जुन्या काळातील लोकांची अशी अपेक्षा होती की. आपल्या घरातील मुलाबाळांची संख्या वाढावी. आपले मनुष्यबळ वाढावे. परंतु आजचे दिवस बदललेले आहेत. लोकसंख्या वाढीमुळे घरातील लोकांच्या आवश्यक त्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. म्हणून त्याला आपले जीवन सुखासमाधानाने जगता येत नाही . 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' हेच चांगले ! तरी कुटुंबनियोजन आवश्यक आहे असा सल्ला लोकांना देतो आहे.

'पाळणा' या कवितेत यशवंत तांदळे यांनी गर्भावस्थततेचे दहा महिन्याचे चित्रण केले आहे. पहिल्या महिन्यात परमेश्वराला विनंती केली आहे. दुसऱ्या महिन्यात घरातील लोकांना झालेला आनंद, तिसऱ्या महिन्यात लोकांच्यात चाललेली कुजबुज, चौथ्या महिन्यात डोहाळे जेवणाचा आनंद ! पाचव्या महिन्यात ओटी भरणी, सहाव्या महिन्यात स्त्रीला लागलेले डोहाळे, व न्हाणीसाठी चाफ्याच्या झाडाची ती मागणी करते, सातव्या महिन्यात ती भावाला आपल्या घरी नेण्यासाठी विनंती करते . आठ महिने पूर्ण होताच घरादाराची सर्वांनी केलेली स्वच्छता व टापटीपीचे चित्रण केले आहे. नऊ महिने होताच आपल्या मुलीला मुलगा झालेला पाहून अतिशय आनंद होतो.

दहा महिन झाल्याती सासू

नातू बघून येतयं हासू

जो बाळा जो जो रे जो "[11]

एकंदर साडे नऊ ते दहा महिन्याचे चित्रण रानकवीने केले आहे. बाराव्या दिवशी बाळाचे नाव ठेऊन गायला गेलेला हा 'पाळणा' शब्दबद्ध झालेला आहे. या पाळण्याचे वेगळे रूप म्हणजे हा पारंपारिक पाळण्यापेक्षा वेगळा पाळणा आहे.

'पाळणा' हे तसे पारंपारिक एक गीत आहे. हे पाळण्याचे गीत मुलाचे बारसे म्हणजे 12 दिवसांनी नाव ठेवतात त्यावेळी म्हणतात. या गीतामध्ये 12 दिवसांचा वृत्तांत असतो परंतु या कवितेत वेगळेपण म्हणजे स्त्री गरोदर राहिल्यापासून ते मूल जन्मल्यानंतर त्याचे नावे ठेवण्याचा कार्यक्रमापर्यंतचा वृत्तांत मांडलेला आहे. स्त्री गरोदर राहिल्यापासून मूल जन्मपर्यंत तिच्या नातेवाईकांना व तिला झालेला आनंद व्यक्त केलेला आहे. जुन्या

प्रकारच्या पाळण्यामध्ये देवादिकांच्या गुणगौरवाचा उल्लेख असतो तसे मात्र या पाळण्यामध्ये पहावयास मिळत नाही हेच यामध्ये वेगळेपण आहे.

'-हाट' या कवितेत रहाट म्हणजे घरातील हाताने फिरवावयाचा चरखा . हे एक धनगरी लोकजीवन जगण्याचे साधन आहे. परंतु त्यांच्यातही कवीचे वेगळेपण आपणाला जाणवते या रहाटाच्या प्रत्येक भागाचे आपल्या नात्याशी संबंध जोडलेले आहेत.

माझ्या -हाटाच्या बाई खामला,
भांडून भांडून जीव माझा दमला·
मग मी पतीला कुडात कोंबला.
माझा -हाट ग साजनी·
कातू चौघीजनी.[12]

या कविता रचनेत योग्य शब्दात यमक साधले आहे. हेच त्याचे वेगळेपण आहे. मेंढराच्या लोकरीचे सूत कातताना ही कविता गायिली जाते. याचा छंद ओवी आहे. त्यामुळे या कविता रचनेला समर्थ गेयता प्राप्त झाली आहे.

'रहाट' हे उपकरण सर्वांना परिचित आहे धनगर समाजातील स्त्रिया या रहाटावर मेंढराच्या लोकरीचे सूत काततात. या सूतापासून घोंगडी विणतात. स्त्रिया रहाटावर सूत कातताना सुख दु:खाचे आणि रहाटाच्या भागाचे नांव घेऊन विशिष्ट चालीवर आपल्या नात्यातील व्यक्तीचे गुणगान गातात. या गीताना विशिष्ट चाल असते. ऐकणाराला हे गीत बरे वाटते व हे गीत लोकगीताच्या प्रकारात मोडते.

'आजचं कलियुग' या कवितेत कवीने ग्रामीण संस्कृतीमध्ये कसे बदल होत चाललेले आहेत याचे वर्णन या कवितेत केले आहे. . माणसाच्या वागण्यामध्ये बदल होत चाललेला आहे, कोणीच कोणाला मानत नाही, म्हणून कवी म्हणतो की "निसर्गही आज रोजी बदलायला लागलेला आहे."

सासू सूनचं भांडण लागलं
सुन सासूच्या झिप-या वडं,

पोरगा बापाला मारी व जोडं,

रीत सुटली व कलीयुगांत.

सासरा धरतो सुनचं हात.

कसा पाऊस पडल कलियुगात ? [13]

कुटुंबातील कोणत्या माणसाला कोणता मान द्यावा हे अलिखित ठरलेले असते. जोपर्यंत समाजातील माणसे तशाप्रकारे वागत होती तोपर्यंत सर्वकाही व्यवस्थित होते. परंतु आजरोजी घरामध्ये सासूसूनेची भांडणे चाललेली आहेत. सून सासूच्या झिफऱ्या ओढत आहे. मुलगा बापाला मारतो आहे . काही पुरूष मंडळीनी नितीमत्ता सोडलेली आहे. सासू व जावयाचे नाते वेगळेच होऊन बसलेले आहे. घरातील थोरला भाऊ मयत झाल्यानंतर तिच्या दिराने कसे वागावे? त्याच्याही वागण्यात बदल झालेला आहे. भावा- भावामध्ये भांडणे चाललेली आहेत. घरामध्ये भावाच्या बायकोने भावाला बोलायचे नाही जर बोललेच तर भावाभावामध्ये भांडणे सुरू होतात. तरूण वयातील तरूण-तरूणी ह्या वेगळयाच प्रकारे वागत आहेत. आजचा तरूण वर्ग हा सिनेमातील हिरोसारखा वागायला लागलेला आहे. आजचे तरूण जोडपे आपल्या आईवडिलांना घराच्याबाहेर म्हणजे छपरामध्ये ठेवायला लागले आहे. त्यांना जेवणही लांबूनच देत आहे . जावाजावाचे पटत नाही. लग्न होऊन गेलेल्या मुलीला परत माहेरी आल्यानंतर कोणीच मान देत नाही. अशी ही घरामध्ये चाललेली अवस्था त्यामुळे कोणालाच कोणाविषयी आपुलकी रहात नाही. एकत्र कुटुंबाचे विभाजन होते.

माझ्या नवऱ्याला बाई मी सांगते,

साऱ्या घराला फोडून टाकते,

करीन संसार बाजूला जोरात,

सासू-सासरा नक घरात,

कसा पाऊस पडल कलियुगात ? [14]

असे कवीने आजच्या कलियुगातील व्यक्तिचे उपरोधात्मक चित्रण केलेले आहे.

आजरोजी सर्वच लोकांच्या वागण्यात बदल होत चाललेला आहे. घरामध्ये सासू सूनेचे नाते

मायलेकीचे असावे . सासरा हा आपल्या सूनेशी लेकीची वागणूक देते होता . आजचा पुरूष हा आपल्या पत्नीशी कसा कसा वागतो. सासू व जावई हे माय लेकराप्रमाणे वागत होते. घरातील थोरल्या भावाच्या पत्नीला मातेसमान वागणूक दिली जात होती. परंतु तोच थोरला भाऊ मयत झाल्यानंतर तिच्या पत्नीला चांगली वागणूकदिली जात नाही. भावाभावामध्ये भांडणे होत नव्हती. म्हाताऱ्या झालेल्या सासू सास-यांना चांगली वागणूक दिली जात होती. या सर्वाच्या वागण्यात व वृत्तीत बदल झाल्यामुळे पाऊस पडत नाही. लोकाच्या नितीमत्तेत जर फरक झाला तर सर्व काही ठीक चालेल असे कवीला वाटते

**सारांश** - यशवंत तांदळे यांच्या सामाजिक कविता ह्या समाज परिवर्तनातून साकार झालेल्या आहेत. शिघ्रता व उत्स्फुर्तता हे तिचे विशेष आहेत. ती मार्मिक शब्दातून व्यक्त झाली आहे. पाल्हाळ कुठेही नाही अल्पाक्षर रमणीयत्व हे तिचे वैशिष्टय आहे. लोकमानसाच्या चर्मचक्षूसमोर तिचे भयानक स्वरूप स्पष्ट दिसून येते. गेयता हे तिचे आणखी एक वैशिष्टय आहे. जनमानसाची अभिरूची कवीने ओळखली होती. कवीने अशिक्षित लोकांना ज्या काही गोष्टी माहीत नाहीत त्याच त्यांनी आपल्या काव्यरचनेत मांडल्या आहेत. समाजामध्ये होत चाललेल्या बदलाचे सूक्ष्म निरिक्षण करून समाज परिवर्तनाचेही काम त्यांनी आपल्या काव्यात केले आहे असे म्हणजेच योग्य आहे.

**यशवंत तांदळे यांच्या कवितेतील ग्रामीण संस्कृतीचे दर्शन**

यशवंत तांदळे हे ग्रामीण भागामध्ये असल्यामुळे त्यांच्या कवितेला ग्रामीण समाजरचनेचा साज आहे. त्यांच्या ग्रामीण कविता संख्येने अत्यल्प आहेत.

'राजा शेतकरी' या कवितेत आपणाला ग्रामीणतेचे खरेखुरे चित्रण पहावयास मिळते कवी म्हणतो 'शेतकरी हा दुनियेचा राजा आहे' कारण त्याच्या कष्टावरच सारा समाज व सभोवतालची माणसे जगत असतात. आठरा विश्व चालत आलेले दारिद्र्य, पिढयानपिढया त्याच्या नशिबी आहे. ते दारिद्र्य नाहीसे होण्यासाठी तो शेतात विहिर काढतो , चार गुराढोरांचा प्रपंच सुरू करतो, जमीनीची मशागत करतो, वेगवेगळया प्रकारची धान्ये पिकवितो, त्याचबरोबर घरातील मुलाबाळांची वाढ व्हावी असेही त्याला वाटते. परंतु त्यांच्या शाळेचा आणि कपडयाचा प्रश्न त्याच्यापुढे निर्माण होतो ते खालील ओळीतून कवीने व्यक्त केले आहे.

आठरा धान्यानं भरलं घर

तरीबी पैसा मिळना वेळंवर.

त्येच्या घरात दोन चार पोर.

शाळला म्हणती जाणार,

त्येना पाटी पुस्तक कोण देणार?"[15]

परंतु येवढे करुनही त्याच्या वाटयाला उपासमारच येते. हे शेतकऱ्याचे चित्र या कवितेत मांडलेले आहे. तसेच निसर्गाच्या भावछटाही त्यांनी आपल्या कवितेत रेखाटल्या आहेत.

सारांश गतकाळातील शेतकरी आणि त्याचे द्रारिद्रय याचे चित्रण आलेले आहे. ही कविता गतकाळातील शेतकऱ्याचा अवघा प्रपंचच आपल्यासमोर मांडते आहे. शेतकऱ्याचे जीवनच आपल्यासमोर चलचित्रासारखे तरळत रहाते. शेतकरी हाच दुनियेचा राजा आहे असे कवीला म्हणावयाचे आहे.

'नवा शेतकरी' ही कविताही शेतकरी जीवनावरील आहे. परंतु या शेतकऱ्याच्या मध्ये फरक जाणवतो. कारण या कवितेत आलेला शेतकरी हा आधुनिक शेतकरी आहे. यंत्रयुगाच्या किमयेनंतर शेतकरी जीवनात झालेला फरक हा या कवितेत चित्रित झालेला आहे. शिक्षणाचा प्रसार होण्यास सुरूवात झाली. त्यातून कायदयाची माहिती झाली. त्यातूनच या शेतकरी जीवनाचे स्वरूप बदलले. ओसाड माळाचे त्याने यंत्रयुगाच्या सहाय्याने नंदनवनात रूपांतर केले. आणि मोठया प्रमाणावर भाजीपाला, फळफळावर निर्माण करू लागला. परंपरेने चालत आलेली बैलगाडी च्या जागी ट्रॅक्टर, टेम्पो, ट्रक आले. वहातूकीसाठी म्हणून याचा वापर होऊ लागला. पूर्वीच्या शेतकऱ्याप्रमाणे तो आता मळकट राहिला नाही. जाडेभरडे कपडे जावून तलम कपडे अंगावर आले. आणि जणु काय तो पुढारीच शोभायला लागला. बँकांची कर्जे व वेगवेगळया सुविधा त्यांनी मंजूर करून घेतल्या. इरिगेशनचे पाणी त्यांनी गावात व मैलच्या मैल दूर शेतात नेले व ओसाड माळावरती त्याने ऊसासारखे पीक घेतले. त्यातूनच कारखाने ऊभे राहिले. शेतात जाण्यासाठी आता तो पायपीट करीत नाही, तर मोटारसायकल व स्कूटरचा वापर करतो. सूटाबूटात तो शेतात जातो. आणि दुरूनच शेताची पाहणी करतो. शेतीमधील नवनवीन माहिती झाल्यामुळे आजचा शेतकरी हा प्रगतशील झाला. परंतु कष्टाळू वृत्ती त्याची कमी झाली. ही दुखःद सल कवीच्या अंतरंगात सलत राहाते हे पुढील पंक्तीतून दिसून येते.

आसे बी झाले शेतकरी,

स्कूटरवरनं फेऱ्या मारी,

सूटाबूटात जाई शेतावरी,

लांबूनच पहाणी करी,

कापडाला लागंल माती म्हणूनी,

दुरूनच शेताला सलाम करी.[16]

वरील कवितेच्या बाबतीत असे म्हणता येईल की, जुन्या काळातील शेतकऱ्याला शेती करण्याची माहिती होती. परंतु आजरोजी शेतीविषयक नवनवीन शोध लागलेले आहेत. थोडया कष्टात जास्त उत्पन्न कसे घेता येईल हे कळू लागले. त्यामुळे आजचा शेतकरी कमी कष्टात जास्त उत्पन्न घेऊ लागला. स्वतः शेतात कष्ट करण्याची वृत्ती त्याची कमी झाली. व कर्ज काढण्याची वृत्ती वाढली. कर्ज काढली पण त्याप्रमाणे शेतात पीक निघेना. कारण त्याची कष्ट करण्याची वृत्ती कमी झाली. उत्पन्न कमी निघू लागले. घरातील खर्च व बँकाची काढलेली कर्जे याचा काही मेळ लागेनासा झाला. कर्जे वाढत राहिली व शेतकरी कर्जबाजारी झाला. थोडक्यात कवीला हे सुचवावयाचे आहे की नव्या शेतकऱ्याची कष्ट करण्याची वृत्ती कमी झाली, त्यामुळेच त्याची अशी बिकट अवस्था झाली.

'चारी सबाद सारखं' या कवितारचनेत पारंपारिक आलुते-बलुतेदारांच्या कामाबाबत वर्णन आहे. ग्रामीण भागामध्ये आलुते बलुतेदार हे कसे एकमेकाशी निगडीत असतात याचे सविस्तर वर्णन आहे.

सुतार सुतारकाम करतो, कुणबी पेंडी बांधतो. धनगर मेंढया राखतो, ब्राम्हण भेंडी (शाकाहारी जेवण) खातो. मांग नाडा आटतो. चांभार चप्पल बांधतो. सोनार तोडा तयार करतो. शिपाई घोडा पळवितो. नमान हा डोक्याला काहीच न घालता बसतो. माळी दोडके विकतो. रंगारी रंग उडवितो. गोंधळी गोंधळ घालतो, वाणी हिंग विकतो, गुरव शिंग फुंकतो, न्हावी दाढी करतो. ठाकर लबाडी करतो. कोष्टी साडी विणतो, परीट ईस्त्री करतो. बुरूड पाटया वळतो, रामोशी काठी फिरवितो. पाटील चिठया वाचतो. सनगर गाठी मारतो, दुकानदार पुडया बांधतो . तेली धान्यावर तेल काढतो. कोळी चुन्याचे खडे भाजतो, कासार बांगडया भरतो.

हॉटेलवाला चहाचा कप भरतो, शेटी माप घालतो, लोहार भाता ओढतो, महार मोळी बांधतो. कुंभार मडकी भाजतो, शिंपी चोळी शिवतो. गवंडी घराची चाळ बांधतो, भोई मासे पकडण्यासाठी नीर घालतो. होलार सूर काढतो, बागडी माशाकरिता जाळे टाकतो. गुळव्या गुळ रांधतो, तांबट भांडी करतो. बागवान केळी विकतो, बटवदार गुंडया बांधतो. हमाल तोंडाने बडबड करतो. खानावळीवाला भांडी घासतो, ढोर चामडी रंगवितो, मुलाणी कोंबडी कापतो, वैद्य तुंबडी लावतो, पाथखट दगड घडवितो. पिंजारी लोकरीचे जान करतो. पित्र्या लोकांना पिसे घालून खेळ करतो. मान्त्रिकही तसेच खेळ खेळतो. अशा रीतीने ग्रामरचनेत प्रत्येकाचे स्थान वेगवेगळे आहे. हे वरील कवितेत वर्णन केले आहे.

तसेच याच कवितेत भटक्या लोकांचाही उल्लेख आलेला आहे. डवरी लोक डिबडे वाजवतात. जोशी लोक व्हर (बरेच खोट बोलून करमणूक करतात) सांगतात. बहुरूपी लोक वेगवेगळी सोंगे काढून लोकांची करमणूक करतात. फकीर हे फिरूनच आपले जीवन जगत असतात. तमासगीर गाणे म्हणून, दांगट तुणतुण वाजवून, मरीमेवाले डोक्यावर देवी घेऊन ढोलके वाजवून, आरादी लोक आपल्या हाताच्या बोटाच्या खुणेवरून अक्षर ओळखून, वासुदेव मोरपंखी टोपी घालून, जोगती आपल्या डोक्यावर जग घेऊन, माकडवाला माकडाचा खेळ करून, डोंबारी उडया मारून करमणूक करतात.

मरीमीवाला पूजीत हुता देव,
आरादी वळवीत हुता नांव,
वासुदेव फिरत हुता गांव,
जोगती डोसक्यावर घेतो देव![17]

या करमणूक करणाऱ्या व्यक्ती ह्या ग्रामीण भागामध्ये जास्तीत जास्त पहावयास मिळतात.

याचबरोबर भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी ज्या नेत्यांनी म्हणजे महात्मा गांधी, सुभाषबाबू, पंडित नेहरू, नाना पाटील यांच्या कर्तव्याबाबतही वर्णन केलेले आहे.

महात्मा गांधीनी केला असहकार,
सुभाषबाबूंचा बंदूकीवर जोर,
पंडित नेहरू जाहले म्होर,
नाना पाटलाचं पत्री सरकार.[18]

वरील काव्यरचनेत प्रत्येक जाती जमातीतील लोकांचा व्यवसाय वेगळा आहे. हे सर्व लोक आपणास ग्रामीण भागामध्ये पहावयास मिळतात यांचे आणखी एक वेगळेपण म्हणजे भटक्या व विमुक्त जातीतील लोक तसेच मंत्री , नेतेमंडळी ही ग्रामीणतेशी कसे निगडीत आहे हे दिसून येतात गावगाडयाचे हे नवे रूप कवितेत प्रथमच पहावयास मिळाले. ग्रामीण संस्कृतीचा हा वास्तव वस्तुपाठच आहे.

किर्लोस्करवाडी ' ही त्यांची कविताही ग्रामीण जीवनाचे वर्णन करणारी कविता आहे. किर्लोस्करवाडी हे गांव तासगांव तालुक्यात असून सांगली जिल्हयामध्ये आहे. याठिकाणी मायाप्पा देवाचे देवस्थान आहे. या देवाची पूजा करणारा म्हाकू नावाचा पुजारी आहे. या किर्लोस्करवाडीत ऐकदिवशी लक्ष्मणराव किर्लोस्कर नावाचे ग्रहस्थ आले. व त्यांनी याठिकाणी लोखंडी सामानाचा कारखाना उभा केला. या कारखान्यात प्रथमतः त्यांनी शेतकऱ्याच्या उपयोगासाठी लोखंडी नांगर तयार केला. हा नांगरच पुढे जमीनीची मशागत करू लागला अशा या लक्ष्मणराव किर्लोस्कराच्या पोटी पुत्र नव्हता. मग त्यांनी शंकरराव किर्लोस्कर यांना दत्तक घेतले. त्यांना चार मुले झाली व त्यानीच पुढे कारखान्याची प्रगती केली. त्यांनी गोरगरिबांच्यावर फार मोठे उपकार केले. तत्कालीन स्थितीत आसपासच्या खेडयातील सुमारे 5000 लोक कामाला लावले. तसेच इथे प्रथम किर्लोस्कर नावाचे मासिक निघाले.

झालं मुकुंदराव किर्लोस्कर,
डोक चालवलं त्यान म्होर.
छापली मासिक तीन चार,
वर नाव दिलय किर्लोस्कर,[19]

वरीलप्रमाणे किर्लोस्करवाडीचे चित्रण कवितेत केले आहे.

वरील कवितेबाबत असे म्हणता येईल की, ज्याठिकाणी किर्लोस्करवाडी वसलेली आहे. तेथे संपूर्ण माळरान होते. त्या माळावर कोणतेही पीक येत नव्हते. परंतु ओसाड असा तो परिसर होता. या ग्रामीण परिसरात लोखंडी कारखाना निघेल असे कोणाच्या ध्यानीमनीसुध्दा आले नव्हते. परंतु याच ग्रामीण भागातील लोकांना आपल्या कारखान्याच्या माध्यमातून काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. सुमारे 5000

लोकांना काम मिळवून दिले. ग्रामीण भागाचा कायापालट करून दाखविला हे या कविता रचनेतून कवीने दाखवूत दिले आहे.

सारांश रानकवी यशवंत तांदळे यांनी ग्रामीण कवितेतून ग्रामीणतेचे हुबेहुब चित्रण केले आहे. 'राजा शेतकरी' या कवितेत जुन्या काळातील शेतकरी निसर्गाशी समरस होता. त्याच्या शेतातील विहिर, दावणीला चारदोन जनावरे, शेती मशागतीसाठी बारा बैलाचा नांगर, शेतकऱ्याची राहणी साधी इ. बाबी पहावयास मिळतात. जुन्या काळातील शेतकरी हा कष्टाळू होता. त्याला कोणतीच गोष्ट कमी पडत नव्हती म्हणून कवी त्याला राजा शेतकरी म्हणतो. नवा शेतकरी शिक्षण घेऊन शेती करू लागला. त्याला नवनवीन माहिती मिळू लागली दुसऱ्याकडून काम करवून घेण्याची वृत्ती त्याच्यामध्ये बळावली. त्याची स्वतःची कष्ट करण्याची वृत्ती कमी झाली, आपोआपच तो कर्ज काढू लागला. त्याची शेतीच्या उत्पादनातून कर्जे भागेनात. साहजिकच तो कर्जबाजारी झाला. तसेच 'चारी सबाद सारखा' या कवितेत खरेखुरे ग्रामीणतेचे दर्शन घडते. ग्रामीण भागामध्ये अलुते बलुतेदार हे कसे एकमेकाशी निगडीत असतात. हे दिसून येते. वंशपरंपरेने चालत आलेले व्यावसाय , भटके लोक, हे ग्रामीणतेशी कसे निगडीत असतात हे दिसून येते. 'किर्लोस्करवाडी' या कवितेतून असे दिसून येते की, एखाद्या ग्रामीण भागाचा माळरानावर कायापालट होऊ शकतो हे दिसून येते. ग्रामीण भागामध्ये कोणी कोणते काम ( व्यवसाय ) करावयाचे हे ठरलेले असते. व त्या व्यवसायापासून ते लोक बाजूला जावू शकत नाहीत. हे आजही दिसून येते. ग्रामीण भागातील लोकजीवन हे वेगळयाच प्रकारचे असते हे पहावयास मिळते. संख्यात्मकदृष्टया या ग्रामीण कविता अल्प आहेत परंतु वैचारिकतेच्या बाबतीत या कविता वेगळया प्रकारच्या आहेत हे नाकारता येत नाही.

**यशवंत तांदळे यांच्या कवितेतील निसर्ग**

रानकवी यशवंत तांदळे यांचे एकंदर जीवन हे निसर्गाच्या सहवासातच गेलेले आहे. संपूर्ण निसर्गाचा सहवास हाच त्यांचा सोबती होता. निसर्ग हाच आपला सगा सोयरा आहे असे त्यांना वाटत होते. या सग्या सोयऱ्याच्या संगतीत त्यांची कविता रंगत राहते. रानावनात फिरताना पशू, पक्षी हेच कवीचे मित्र होतात. सभोवताली थकून बसलेला मेंढराचा कळप हाच त्यांचा परिवार होतो. मेंढराचे सुख हेच आपले सुख त्यांना

वाटते. म्हणूनच निसर्गातील बदल किंवा त्याची अवकळा ही त्यांच्या हृदयाला बोचत राहाते. निसर्गाची विविध रूपे यांच्या कवितेत येतात. परंतु जास्तीत जास्त भकास निसर्गच त्यांच्या कवितेतून अविष्कृत होतो. या कविता पुढीलप्रमाणे.

'1972 चा दुष्काळ' ही कविता निसर्गातील भयानकता आणि त्याचमुळे मानवीजीवनाला आलेली अवकळा व दुष्काळात मानवी जीवनाची झालेली स्थिती त्यांनी रेखाटली आहे.

पावसाने अवकृपा केल्याने संपूर्ण सृष्टीतील हिरवे चैतन्य नाहीसे झालेले आहे. विहिरीतील पाणी आटून गेले आहे. नद्याचा प्रवाह आटलेला आहे. अशी अवस्था असली तरी तरूण वर्ग मात्र मनोरंजनात कमी पडलेला नाही. सिनेमाच्या खोळांना मोठी गर्दी आहे. चहा, दारू, गांज्या या साऱ्या चैनीच्या वस्तू महाग झालेल्या आहेत. शेतकऱ्याची मात्र वाईट दशा झाली आहे. गुरांच्या बरोबर कुटुंबातील बायकामुलेही उपवासी मरू लागली आहेत. याचवेळी सरकारने दुष्काळी कामाची घोषणा केली. या दुष्काळी कामावर मजूर मात्र आनंदात दिवस कंठीत होते. पहिल्यापासून खाल्लेली जोंधळयाची भाकरी आता नाहीसी झाली आणि मिळणाऱ्या पगारावर दारू मटणाची हौस पुरवून घ्यायला सुरूवात केली. या कवितेमध्ये कवीने मध्येच निवेदन केलेले आहे व त्यात म्हटले आहे की गोरगरीब लोकांचे फार मोठे हाल झाले. दुष्काळी कामावर लोक काम करताहेत ती कशी तर -

खांदतो मुरूम नवरा माळाला
मारतो बघा धडका दगडाला,
भरून देतो पाटी बायकोला.
आले पानी माऊलीच्या डोळयाला.[20]

काही शेतकऱ्यानी आपल्या बैलासाठी प्राणत्याग केला. हा त्याग म्हणजे वीरपुरूषाच्या त्यागासारखा आहे. शेतकरी जीवनाचे चित्रण चारच ओळीत केले आहे. परंतु ते जीवाला चटका लावणारे आहे. आपल्या खांद्यावर भाकरीचे गाठोडे घेऊन, घरातील बैलाची दावणं रिकामी करताना त्याचे अंतःकरण पिळवटून निघते. याचवेळी साखर कारखान्यांनी जनावरासाठी छावण्या उभ्या केलेल्या होत्या. त्यामध्ये त्याने आपली जनावर

नेऊन बांधली अगदी रस्त्यावरील लुदभरी कुत्रीही त्याला भुंकत आहेत. हे काहींच्यावर भूकेसाठी 12 केळांना बैल विकण्याची वेळ आली. जनावराच्या बाजारातील हेडेकरी व कसाब यांची मात्र चैन झाली. स्वतःच्या हातानी वाढवलेली जनावरे कसाबाच्या हातात देताना या शेतकऱ्याना काय वाटले असेल ? कवी म्हणतो " माणसापेक्षा जनावराचे मोठे हाल झाले. भांडवलदार, व्यापारी, नोकरदार, या सर्वासमोर शेतकऱ्याचे हसे झाले,

भांडवलदार हासतो शेतकऱ्याला
व्यापारी हासतो शेतकऱ्याला
नोकरदार हासतो शेतकऱ्याला
शेतकरी भिकारी झाला.[21]

तो कंगाल झाला. स्वतःची लहान लहान पोरे घेऊन हा शेतकरी दुष्काळी कामावर जावू लागला. झाडाच्या सावलीला टाहो फोडणाऱ्या मुलाला पाहून अंतःकरण पिळवटून निघते. तसेच बाळाला ऊन लागलेले पाहून तिचा जीव कासावीस होतो. कारण तिला अधिका-याच्या दबावाखाली काम करावे लागते खायला भाकरी, कालवण, भेंडी, गवारी हे पुरेसे मिळत नव्हते. याच काळात शेठ मफतलालने पुरविलेली सुकडी त्याच्या उपवासी पोटाला आधार झाली. म्हणून कवी त्याला धन्यवाद देतो. याच दीनदुबळयांना तोच आपला ईश्वर वाटायला लागतो.

' 1972 चा दुष्काळ ' या कवितेत कवीने दुष्काळात झालेल्या हालाखीचे वर्णन केले आहे. दुष्काळाच्या अगोदर सर्व काही व्यवस्थित होते. मात्र दुष्काळ पडल्यामुळे ज्या लोकांनी कधी घरदार सोडले नव्हते, अशानाही घरदार सोडून कामावर जाण्याची वेळ आली होती. शेतकऱ्याला मात्र आपल्या व जनावराच्या पोटापाण्यासाठी भटकंती करण्याची पाळी आली. ज्या बैलावर स्वतःच्या मुलाप्रमाणे माया केली होती त्याला फक्त 12 केळावर देण्याची वेळ आली. ज्या स्त्रिने कधी आपल्या नवऱ्याचे बोलून घेतले नव्हते त्यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अधिकाऱ्याचे बोलून घ्यावे लागले. तसेच या काळामध्ये काही लोकांची चैन करण्याची वृत्ती बळावली. शेतकऱ्याना लुटण्याची वृत्ती वाढली. म्हणजेच, ' 1972 चा दुष्काळ ' या कवितेवरून असे पहावयास मिळते की शेतक-याची दुरावस्था, कामचुकार लोकांची चैनी, जनावराचे हाल, तसेच लोकांना आधार

म्हणून मफतलाल शेठने दिलेली सुकडी, या सुकडीवरतीही काही लोकांनी दिवस काढले अशा प्रकारची वेळ पुन्हा कधी येऊ नये हेच चित्रण वरील कवितेत दिसून येते.

'1974 सालचा इसाळा' या कवितेत कवीने ओल्या दुष्काळाचे चित्रण केलेले आहे. 'इसाळा' हा ज्वारीच्या पिकावर पडणारा एक प्रकारचा रोग आहे. ज्वारीच्या पिकाला मोठी कणीसे येतात पण त्याला दाणे येत नाहीत, या अवस्थेला 'इसाळा' असे म्हणतात. सृष्टीतील भकासपणा येथे चित्रित झालेला नाही, तर मानवाला निसर्गाने दिलेली दुसरी हूल आहे. कवी सुरूवातीस म्हणतो की 72 चा दुष्काळच बरा म्हणण्याची वेळ लोकांच्यावर आलेली होती .

भुईमूगाला आल्या शेंगा दोन चार,

ताट जुंधळयाच हिरवगार,

कणसं आली व मोठी फार,

नुसता सोटाच हातभर.

नाही कणसाला दान चार.

साल चौऱ्याहत्तर म्हणं लय बर.[22]

1974 हे साल पीकपाणी आणि जनावराच्या दृष्टीने सुखाचे होते, परंतु अन्नधान्य मात्र लोकांना झाले नाही हे वरील ओळीतून स्पष्ट होते. पाऊस भरपूर पडला धरत्री हिरवीगार झाली मात्र जोंधळयाचे, हायब्रीडचे पीक मात्र गेले . भुईमूगाला अत्यंत कमी शेंगा आल्या. जोंधळयाला दोन ते तीनच दाणे आले. लेव्हीचा वसूल मात्र अधिकाऱ्याने केला आणि होते नव्हते ते धान्य घेऊन गेले. लोकांच्यामध्ये काळयाबाजाराची वृत्ती वाढली. गोरगरीबांची उपासमार झाली. धनिकाच्या दृष्टीने मात्र हे साल बरे गेले . शेतकरी व गोरगरिबाची मात्र अवदसा झाली असे कवीने वर्णन केलेले आहे.

वरील कवितेत कवीला कोरडया दुष्काळापेक्षा ओला दुष्काळ बरा असे म्हणावयाचे आहे. कारण ओल्या दुष्काळात भरपूर पाणी, चारा आला परंतु लोकांची जीवनावश्यक गरज म्हणजे धान्ये मात्र काहीच पिकली नाहीत. ज्वारीच्या पिकावर 'इसाळा' नावाचा रोग पडला त्यामुळे ज्वारीच्या कणसांना अत्यंत कमी दाणे आले.

सरकारला वाटले भरपूर पीक आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र तशी परिस्थिती नव्हती अगदी थोडेच धान्य पिकले व ते धान्य लेव्हीच्या रूपाने सरकारने घेतले. म्हणून लोकांना वाटले पाऊस न पडताही धान्य पिकले नाही. व पाऊस पडूनही धान्य पिकले होते तेही आपल्या पदरी नाही. म्हणजे निसर्गाने जणू आपली परीक्षाच घेण्यास सुरूवात केली असे सर्वांना वाटले. हा दुष्काळा-दुष्काळातील फरक पहावयास मिळतो. म्हणजे सर्वांचे जीवन हे निसर्गावरच अवलंबून आहे. हे वरील कवितेतून दिसून येते.

'1975 ची मीजमाशी' या ही कवितेत ओल्या दुष्काळाचेच चित्रण आलेले आहे. मीज माशी सारख्या कीटकाने सपूर्ण पीक नाहीसे होते हे या कवितेतून पटवून दिले आहे ही कविताच यशवंत तांदळे याना रानकवी हा किताब देऊन गेली. या कवितेनेच त्याना खरीखुरी प्रसिद्धी मिळवून दिली. या कवितेत निसर्ग चित्रणाबरोबर मीजमाशीच्या स्थित्यतराचे वर्णन कवीने केले आहे. मीजमाशी आपले जीवन फुलवऱ्यावर जगते असते. आपला उदरनिर्वाह त्या फुलवऱ्यावरच करीत असते. मीजमाशी कणसावर अडी घालते, ही माशी दिसायला अत्यत लहान असते. तिचे आयुष्यही कमी असते. फक्त 24 तास ती जगते. परंतु तिची उत्पत्ती मात्र फार मोठी आहे. 150 अंडी घालते. या माशीच्या चार अवस्था सागितलेल्या आहेत. अंडी, अळी, पिली व पूर्णमाशी या चार अवस्था त्यानी खालील पक्तीत सागितलेल्या आहेत.

माशी दिसनीला बारीक फार,
लांब पाय बघा तिला चार
कमी माशीला आयुष्य फार,
चोवीस तास माशी जगणार,
पण, अंडी घालतिया दीडश्याच्या म्होर.
तिला हुतात दीडशे पोर.
कसा निघलं शेतकरी वर ? [23]

या माशीच्या विनाशासाठी म्हणून शेतकऱ्यानी 10% बी. एस. सी. पावडर वापरावी म्हणजे तिचा नायनाट होतो असे कवी सुचावतो.

सारांश 'मीजमाशी' ही सर्वांना माहीत होती. तिच्या अवस्था , आयुष्यमान, उत्पत्ती व विनाश कसा होतो हे सर्वसामान्यांना माहिती नव्हते. हे कवीने अगदी सुक्ष्मपणे निरिक्षण करून वर्णन केलेले आहे. अत्यंत सूक्ष्म निरिक्षण , एखादा निरक्षर माणूस करू शकतो हे कोणाला पटणारे नव्हते. मात्र त्यांनी 1975 मध्ये 'अखिल भारतीय मराठी साहित्या संमेलन' कराड येथे भरले होते या संमेलनामध्ये आपल्या धनगरी वेशात व्यासपीठावरून 'मीजमाशी' कविता गाऊन दाखविली. त्यामुळे त्यावेळी व्यासपीठावरील असणा-या साहित्यिकांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्याचवेळी मा. पु. ल. देशपांडेनीही कविता ऐकून ' रानकवी' हा किताब यशवंत तांदळे यांना दिला. व तेंव्हापासून त्यांना कवी म्हणून प्रसिद्धी मिळाली. अशी ही निसर्गाच्या सानिध्यात सूक्ष्मनिरिक्षणात्मक कविता कवीने रचली आहे. यावरून असे दिसते, की, रानकवी यशवंत तांदळे हे निसर्गाच्या जवळ जातात. तरीही त्यांच्या कवितेत निसर्गाच्या विविध भाव छटा येत नाहीत. परंतु निसर्गात या माशीची होणारी उत्पत्ती आणि तिची उत्क्रांती कसकशी होत जाते हे आपणास पहावयास मिळते तेही एका सुंदर गीतात.

'1976 चा कृष्णेचा महापूर' ही कविता म्हणजे निसर्गाने माणसावर आणलेले आणखी महाभयानक संकट होय. निसर्गातील दोन्हीही रूपे कवीने आपल्या कवितेत रेखाटली आहेत. (1) पावसाच्या अभावी निसर्गाची झालेली दुर्दशा व (2) अतीवृष्टीमुळे मानवी जीवनाची झालेली दैन्यावस्था. यामध्ये अतिवृष्टीमुळे माणसाचे किती नुकसान होते याचे चित्रण या कवितेत केले आहे. 1976 च्या महापूराने कृष्णा व कोयना नदीकाठच्या गावात राहाणाऱ्या लोकांचे कसे हाल झाले याचे चित्रण या कवितेत आहे. या नदीकाठच्या लोकांची धावपळ झाली. , नदीकाठची शेते, व ऊसही वाहून गेले. लोकांचे काळीजच जणू करपून गेले. या महापूराने लोकांची घरे कोसळली. पाली गावाला पूराच्या पाण्याचा फार मोठा तडाखा बसला. भुयाच्या वाडीची घरे पडली. काही लोक बेघर झाले. काही लोकांची वहाने वाहून गेली. सरकारने लोकांना आर्थिक मदत केली. परंतु त्यातही काळाबाजार झाला. लाचखाऊ वृत्ती वाढली. गोरगरीबापेक्षा आदल्यामधल्या अधिकाऱ्यानी खूप पैसे खाल्ले.

मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण आले·

पाच लाख रूपये मंजूर केले·

सादली बघा मधल्या आदल्यांची

रहिली आठवण शहात्तरची·

कृष्णा आन कोयनेची·[24]

वरीलप्रमाणे पुराच्या वेळची दुसरी वास्तवताही सांगितली आहे.

सारांश-सर्वांना पावसाची आवश्यकता असते. पाऊस प्रमाणात पडला तर त्या पावसाचा सर्वांना उपयोग होतो. परंतु पाऊस जास्त पडणे किंवा अचानक पडणे त्यामुळे लोकांची, शेताची, पिकाची,व जनावराची, दैन्यावस्था होते. हे माणसाला परवडणारे नाही. कारण कोणतीही बाब अती झाली की तिची परिणिती वाईटात किंवा विनाशात होत जाते. हेच आपणाला या कवितेतून पहावयास मिळते. 1976 च्या महापूराने सर्वच बाबीचे नुकसान झाले. कृष्णा व कोयना नदीकाठच्या लोकांची दैन्यावस्था झाली. म्हणजे शेतकरी ज्या ज्या गोष्टीवर अवलंबून आहे, ज्यांच्यावर आपले जीवन जगत आहे तेच नाहीसे झाले मग तो जगणार कसा ? पुरामुळे ज्याचे ज्याचे नुकसान झाले, त्यांना मदत जाहीर केली· ती त्यांना ठरल्याप्रमाणे मिळालीच नाही. मदत देणाऱ्या अधिकाऱ्यानेच मधल्या मधी लाच खाल्ली. व अगदी अल्प प्रमाणात लोकांना वाटली. वास्तवितक पाहता असे घडावयास नको होते. यामुळे काय झाले तर सरकारी अधिकाऱ्यावरील विश्वास कमी झाला. म्हणजेच अधिकारी-वर्ग प्रामाणिकपणे आपले काम करीत नाही हे कवीला सुचवायचे आहे.

'1977 चा ओला दुष्काळ' या ही कवितेत निसर्गातील ओल्या दुष्काळाचे वर्णन आहे. अतिवृष्टीमुळे पीके नाहीसी झाली आणि शेतकरी कंगाल झाला· वेगवेगळे रोग पिकांच्यावर पडले. त्यामुळे ती ही पिके नाहीसी झाली. मोठया प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे शेतातून पाणी साचले. उभ्या धान्याला कोंब फुटले. धान्य झडून गेले. गहू , हरभरा, ही पीकेही नाहीसी झाली. भुईमूग, चवळी , मूग, हुलगा, मटकी ही कडधान्ये आलीच नाहीत. मिरची सारखीही पिके कुजून गेली· शेतकरी हा अन्नाविना पारखा झाला. जे काही थोडे फार पीक आले होते ते ही व्यापाऱ्याने खरेदी केले. भांडवलदार अधिकच श्रीमंत झाले. महागाई वाढली आणि

शेतकऱ्यावर उपासमारीची पाळी आली. त्यातच सावकाराचे व बँकाची कर्जे वाढली व शेतकरी कर्जबाजारी झाला. तो नाहीसाच झाल्यासारखा झाला. कारण कोणाला तरी नोकरी लावावी म्हटले तर वशिल्याशिवाय नोकरी मिळेना अन्नधान्या नाही. त्यामुळे त्याच्या मुलालेकरानी शाळाच सोडली व त्याची ती पिढीच बरबाद झाली. हे त्यांनी खालीत पंक्तीत व्यक्त केले आहे.

लागना नोकरी व गरीबाला,
कमी वशीला पडतोय त्येला.
कुठाय पैसा द्याला वशील्याला,
शाळेत जायचंच पोरांनी सोडलं,
सत्याहत्तर साल पान्यानं बुडलं,[25]

वरील कवितेचा विचार करता असे दिसते की, शेतकऱ्याच्या जीवनात दुष्काळ येतात त्यापैकीच हा ओला दुष्काळ हा होय. मानवाने निसर्गाकडून कितीही अपेक्षा केल्या तरी हा निसर्ग मानवासारखा कधीच वागत नाही. तो आपल्या मताप्रमाणेच वागतो. हे या कवितेतून दिसून येते. पिकांना किती प्रमाणात पाऊस पाहिजे याचे प्रमाण ज्या त्या पिकावर ठरलेले असते. ज्याप्रमाणे एखाद्या माणसाने प्रमाणापेक्षा जास्त जेवण केले तर त्याचे अजिर्ण होते, आजारी पडणे या गोष्टी घडतात. त्याप्रमाणेच पिकाचे होते पीक म्हणजे एक प्रकारचा जीवच आहे. त्याला भरपूर पाऊस पडला की त्या पिकाची अवस्था आजारी माणसासारखी होते. म्हणजे निसर्ग हा कोणत्यावेळी कोणती वृत्ती करेल हे सांगता येत नाही. त्याच्यापुढे कोणालाच जाता येत नाही. त्यामुळे निसर्गवरतीच सर्वांना अवलंबून रहावे लागते त्याला आपण आपल्या काबूत आणू शकत नाही. म्हणून शेतकऱ्याची ही अवस्था होते. हे कवीला म्हणावयाचे आहे.

सारांश, रानकवी यशवंत तांदळे यांनी आपल्या निसर्गविषयक कवितात पाच सहा वर्षाचा कालावधीचा वृत्तांत मांडलेला आहे. अतिवृष्टी , अल्पवृष्टी याचा मानवी जीवनावर कसा परिणाम होतो याचे चित्रण या कवितेते चित्रित केलेले आहे. '1972 चा कोरडा दुष्काळ' यामध्ये लोकांचे, जनावरांचे पाण्याविना कसे हाल झाले. '1974 ला पाऊस पडला' परंतु तो वेळेवर पडला नाही. नको होता त्यावेळी पाऊस काही

प्रमाणात पडला . त्यामुळे जे काही पीक आले होते त्याचे नुकसान झाले. '1975 ला पाऊस भरपूर पडला पीकही बरे आले. परंतु कणसामध्ये ज्यावेळी दाणे भरतात त्यावेळी त्या कणसाच्या फुलवऱ्यावर मीजमाशी नावाच्या माशीने दाणेच येऊ दिले नाहीत. जे काही दाणे आले होते ते सरकारी अधिकाऱ्याने लेव्हीच्या रूपाने वसूल केले. यामुळे लोकांची दयनीय अवस्था निर्माण झाली. '1976 ला' चांगले दिवस येतील असे वाटले होते. परंतु त्यावेळी भरपूर पाऊस पडला. त्यामुळे नद्यांना महापूर आले. कृष्णा कोयना नदी काठच्या लोकांचे नुकसान झाले. त्यांना शासनाने मदत जाहीर केली, ती मदत लोकांपर्यंत अगदी अल्पप्रमाणात पोहोचली. राहिलेली रक्कम अधिकाऱ्यानेच खाऊन टाकली, '1977ला' चांगले दिवस येतील असे वाटत होते परंतु याही वर्षी भरपूर पाऊस पडला त्यामुळे कोणतेच पीक येऊ शकले नाही. त्यालाच कवीने 'ओला दुष्काळ' असे म्हटले आहे. वरील कवितावरून असे दिसून येते, की कवी निसर्गाशी कसा एकरूप होतो व निसर्गातील बारकावे कसे वर्णन करतो. हे 'राजा शेतकरी' या कवितेतही निसर्गाची विविध रूपाने प्रत्ययाला येते . विहिर, विहिरीवर चालणारी मोट, त्या पाण्यावर डोलणारी पिके, मोटेच्या चाकाचा येणारा आवाज, मोटेवर गायले जाणारे गीत, शेतामधून डोलणारी हळद, मिरची, ऊसाची पिके यासारखे वर्णन तसेच 'मीजमाशी' सारख्या कवितेतील वर्णनामुळे त्यांना रानकवी हा किताब मिळाला. वरील सर्व कवितातून कवीची निसर्ग निसर्गाकडे पहाण्याची दृष्टी आपल्या प्रत्ययाला येते.

**यशवंत तांदळे यांच्या कवितेतील राजकीय दर्शन**

रानकवी यशवंत तांदळे यांनी काही राजकीय कविताही लिहिलेल्या आहेत.

'1975 ची आणीबाणी' ही कविता राजकीय कविता होय. 1975 साली इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. या कवितेला ओवीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. गोरगरिबांना मिळणाऱ्या फायदयाचा विचार कवीने येथे मांडलेला आहे. या कवितेत इंदिरागांधीना ज्या काही गोष्टी नको होत्या, त्या बंद करण्यासाठी आणीबाणी पुकारली. यावर कवी म्हणतो की,

दडवून ठेवणार,

महाग दरानं विकणार,

असला भांडवलदार नसावा ग.[26]

आणीबाणीच्या अगोदर देशात काळाबाजार चाललेला होता. गुंडगिरी वाढलेली होती. महागाई वाढलेली होती. तसेच भांडवलशाही होती दगलबाजीची वृत्ती होऊन लाचलुचपतीचे प्रमाण जास्त होते साठेबाजपणा होती. हे इंदिरागांधीना नको होते. सर्वसामान्य माणसे कशी सुखी होतील याचा विचार इंदिरा गांधीनी केला व आणीबाणी जाहीर केली.

आणीबाणी पुकारण्याचा असा हेतू होता की सर्वसामान्यांना, गोरगरिबांना, चांगल्या प्रकारचे जीवन जगता यावे, दगलबाजवृत्ती , काळाबाजार, गुंडगिरी नाहीशी व्हावी असे वाटत होते. म्हणजेच इंदिरागांधीना गोरगरीब माणसाविषयी जिव्हाळा होता. सर्व जनता सुखासमाधानाने जीवन जगावी. यासाठी आणीबाणी जाहीर केली. व ते योग्यच होते . हे कवीला सांगावयाचे आहे. हा वादाचा विषय असला तरी सामान्य शेतक-याची धारणा काय होती हे स्पष्ट होते.

'20 कलमीचा फायदा' ही त्यांची दुसरी राजकीय कविता होय. या कवितेत आणीबाणीतील 20 कलमाचा फायदा कवीने व्यक्त केला आहे. ही 20 कलमे म्हणजे गोरगरिबांना मिळालेले वरदान होय. या 20 कलमामध्ये (1) गोरगरीबांना कर्जमाफी· (2) ज्याला घर नाही त्याला घर द्यायचे· (3) नोकरवर्गाने वेळेवर नोकरीवर गेले पाहिजे· (4) खोटे बोलणाऱ्यास शिक्षा· (5) काळा बाजार करणाऱ्यांना शिक्षा· (6) चोरी करणाऱ्याना शिक्षा· (7) भांडणे करणाऱ्यांना शिक्षा इ. अशा प्रकारची 20 कलमे इंदिरागांधीनी जाहीर केली होती. याचेच वर्णन या कविता रचनेत आहे.

म्हणजेच कवीला याठिकाणी असे म्हणावयाचे आहे की या 20 कलमामुळे लाचखोरीची वृत्ती नाहीशी झाली. गोरगरिबांना न्याय मिळाला . सावकारकी कमी झाली . कष्ट करण्याची वृत्ती वाढली. काळाबाजार नाहीसा झाला. संशयित कायद्याखाली व लबाडी करणाऱ्या भुरटया चोरांना आळा बसला व दीनदुबळयाचे कल्याण झाले.

एकमेक बोलू लागली गोड,
म्हणे आता काळाबाजार सोड,
मिसा कायद्याची पडंल धाड,

चोराची मोडते ग खोड,

वीस कलमीन फायदा केला ग,

सुख लागलं गोर गरिबाला ग.[27]

सारांश यशवंत तांदळे यांच्या उपलब्ध कवितेमध्ये फक्त दोनच राजकीय कविता आहेत. त्यांनी या दोन्ही कवितामधून राजकीय बाबीचे वर्णन केले आहे. आणीबाणी या कवितेत इंदिरागांधीनी सर्वसामान्याचे हित लक्षात घेतलेले आहे. व बेकायदेशीर गोष्टीना आळा बसला . 20 कलमी या कवितेत कोणत्या चुकीस कोणते शासन हे सांगितले आहे. त्यामुळे सर्वच कारभार व्यवस्थित चाललेला होता. सर्वांना न्याय मिळत होता. असा न्याय देणारा नेताच देशाला हवा आहे. असे त्यांना वाटते. इंदिरागांधीच्या विषयी सर्वसामान्य लोकांना आनंद झाला होता. आणीबाणी व 20 कलमीचा फायदा यामुळे जनमानसात त्यांची प्रतिमा उजळून निघाली. या राजकीय कविता असल्या तरी सर्वसामान्यांना न्याय देणाऱ्या कविता होत. आपल्या देशाला लोककल्याणकारी असाच नेता असावा असे वाटते. सरकारचे धोरण सर्व सामान्यांना समजेल अशा भाषेतच वर्णन केले आहे. यावरूनच ते राजकीय बाबीचेही चित्रण करतात हे दिसून येते.

**यशवंत तांदळे यांच्या व्यक्तिविषयक कविता**

यशवंत तांदळे यांच्या कवितेचा आणखी एक प्रकार म्हणजे व्यक्तिविषयक कविता हा होय. या कवितेची उपलब्ध संख्या तीनच आहे. परंतु गुणात्मक दृष्टीने या कविता अतिशय संपन्न आहेत. स्वतःच्या संसारातील व्यक्ती व आपणाला प्रिय वाटणाऱ्या व्यक्ती अशा व्यक्तीचे चित्रण कवीने व्यक्त केले आहे. या कविता म्हणजे त्या व्यक्तिविषयी असणारा आदर व त्याच्याविषयीचे श्रेष्ठत्व होय. व्यक्तिविषयक रचना करीत असताना स्वतःला प्रिय असणारी व्यक्ती ही काव्याचा विषय होऊ शकते ही जाणीव कवीने आपल्या कवितेतून दाखवून दिली आहे.

'आईची माया' ही कविता कवीने आपल्या आईच्या मृत्युनंतर लिहिलेली आहे. आईच्या विषयी जाणवणारा विरह कवी मनाला व्याकूळ करतो या विरह वणव्यात कवी होरपळत राहतो व म्हणतो,

झालं उपकार तुझं ग लई.
माझ्या जलमात फिटणार न्हाई.
किती करू तुझ गुनगान.
आई मला दे ग तुझं वरदान. [28]

आपल्या बालपणापासूनचे भावविश्व कवीच्या डोळयासमोर उभे राहते. ज्या आईच्या पोटी आपण जन्म घेतला. तिचे प्रेम, वात्सल्या आणि परमेश्वराच्या योग्यतेची माझी जन्मदात्री , तिच्या दुधाच्या धारानी माझे ओठ आणि पोट भरले आहे.. त्याचे ढेकर ही त्याची साक्ष आहे. जिच्या मांडीवर लहानपण घालविले , खेळ खेळलो असा मी आता एकाकी झालो असे कवी आपल्या आईविषयी प्रेम व्यक्त करतो.

ज्याप्रमाणे आभाळाला अंत नाही त्याप्रमाणे तुझ्या मायेला अंत नाही. असे कवी आपल्या आईचे मोठेपण वर्णन करतो पुढे म्हणतो 'तु' लहानपणी घेतलेले मुके याची वारंवार मला आठवण होते. मला हसण्याखेळण्यासाठी तुझ्या डोळयाचा दिवा माझ्या मार्गावर जळत ठेवलास.हाताचा पाळणा करून तू मला वाढवलस. अनंत कष्ट सोसलेस आणि त्यातूनच ही माझी दुनिया उभी केलीस माझ्या पाठीशी. तू सावलीसारखी उभी राहिलीस. प्रत्येक गोष्टीत लक्ष लावूनच असावे असा तू मला उपदेश केलास. तुझ्या या उपकाराचे फेड माझ्याहातून होऊच शकत नाही. म्हणून तुझे गुण गावे तितके थोडेच आहेत. तुझ्या आशीर्वादाची किमया फार मोठी आहे. या तुझ्या आशीर्वादावरच मी काव्य करू शकतो . त्यामुळेच मला यश मिळते. यामध्ये मला कधीच अपयश आलेले नाही. केवळ तुझे दर्शन हे ही मला प्रेरक होऊ शकते. आई तुझा हा ध्यानाचा मळा माझ्यामध्ये भरून आलाय. ते कवीने खालील ओळीतून व्यक्त केला आहे.

आई हाय हो धानाचा मळा.
तिनं फुलविला माझा मळा.
तिच्या पायावर वाकवूया मान,
आई मला दे ग तुझ वरदान. [29]

अशा या परमश्रेष्ठ आई मी तुझ्या पायावर नतमस्तक होत आहे. तुझ्याकडे माझी एकच

विनंती आहे की येणाऱ्या प्रत्येक संकटाला सामोरे जाण्याचे सामर्थ्य तू मला दे. अशी कवीने आपल्या आईविषयी थोरवी गायिली आहे.

ही कविता म्हणजे आईचे श्रेष्ठत्व सांगणारी एक भावगीतात मोडणारी कविता आहे. अंतरंगाचे वैचारिक भावरंग येथे कोठेही येत नाहीत. तर उत्स्फुर्ततेपोटी केवळ शब्दाची तडजोड आहे. तरीही भावनेची अलवार स्पंदने पुसटशी उमललेली आहेत. कल्पकतेच्या विश्वात ही कविता रंगत नाही. शब्द अत्यंत साधे व नित्याच्या व्यवहारातील आहेत. आणि त्यामुळे वृतबद्धता साधलेली आहे. कौटुंबिक जीवनातील मातृत्वाभोवती गुंफलेल्या ऋणानुबंधाच्या धाग्यांनी ही कविता साकार झाली आहे.

'माझी बायकू' या कविता रचनेत कवीने बायकोचे शब्दचित्रण केलेले आहे. हे शब्दचित्र त्यांनी प्रातिनिधिक स्वरूपाचे मांडलेले आहे. कौटुंबिक जीवनातील व्यक्तिचित्रणात्मक ही कविता आहे. तरी ही असे वाटते की साऱ्याच स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणारी ही कविता भासते. नवीन लग्न झालेली पोर ही आपल्या बायकोच्या सांगण्याप्रमाणे ऐकतात. त्यांना आपल्या नात्यातील कोणीही नको असते म्हणून तो तरूण म्हणतो :

'मला नको बाबा तुला नको सासरा
'राणी तुझाच मला ग आसरा"
माझी बायकू ग, माझी बायकू.
तुमी सांगाल तसं आमी आयकू.[30]

म्हणजेच या तरूणाला आपल्या आईची, वडिलांची, भावाची व बहीणीची आवश्यकता नाही असे तो स्पष्ट सांगतो.

या कवितेतून कवीला हे सुचवावयाचे आहे की, आजची पुरूष मंडळी बहुतांशी बायकोच्या आहारी गेलेली आहेत. बायकोच्या म्हणण्याप्रमाणे जीवन जगतात. नवऱ्याच्या नात्यातील माणसे ही तिला नकोशी वाटतात. आपल्या घरात आपण दोघेच राजाराणीसारखे जीवन जगूया असे तिला वाटते. म्हणजेच लोकांच्यामधील आज आपुलकी प्रेमभावना कमी कमी होत चाललेली आहे. जो तो स्वतःपुरतेच जीवन

जगण्याच्या पाठीमागे लागलेले आहेत आपलेच जीवन कसे सुखी जाईल याचा तो विचार करतो. थोडक्यात पुरूषाने आपल्या पत्नीच्या आहारी जावू नये. आपल्या नात्यागोत्यातील लोकांना सोडू नये. आपल्या स्वतःच्या कर्तबगारीवर जीवन जगावे असे कवीला सुचवावयाचे आहे. तारूण्यामध्ये अशा प्रकारच्या चुका होतात त्या होऊ नयेत. आपल्या घरातील नात्यातील माणसांना मानावे. असे म्हणावयाचे आहे.

'जन्मभूमी नामदार यशवंतराव चव्हाण' ही एक व्यक्तिविषयक कविता आहे. यशवंत तांदळे यांच्या गावाशेजारीच म्हणजे 5 कि.मी. अंतरावर पूर्वेस देवराष्ट्रे नावाचे खेडेगाव आहे. याच खेडेगावात विठाबाई-बळवंतराव चव्हाण या नावाच्या मातेच्या पोटी यशवंतराव चव्हाणांचा जन्म झाला. देवराष्ट्रे गावाशेजारी सागरेश्वर नावाचे देवाचे मंदिर आहे. तसेच देवराष्ट्रे गावात 'यशवंतराव चव्हाण' नावाचे हायस्कूल आहे. त्या हायस्कूलचे हेडमास्तर भोसले सर आहेत. याचठिकाणी विठामात बोर्डिंग चांगल्या प्रकारे चाललेले आहे. शिक्षणासाठी यशवंतराव चव्हाण कराड या गावी गेले. नंतर ते भारताचे गृहमंत्री झाले. त्यावेळी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे होते. मुंबई शहराबाबतचा जो वाद चाललेला होता तो यशवंतरावांनी सोडविला व मुंबई ही महाराष्ट्राला देऊन टाकली.

यशवंतरावानी बेत काय केला,
मुंबईचा वाद त्यांनी मिटविला.
मुंबई दिली बघा महाराष्ट्राला,
घेतल मग स्वातंत्र्य हाताला.[31]

यशवंतराव चव्हाण यांच्या गावाशेजारीच यशवंतराव चव्हाण यांचे गाव आहे. आपल्या शेजारच्या गावातील खेडेगावातील एक व्यक्ती इतक्या उच्च पदावर पोहचू शकते. याचा कवीला अभिमान आहे. तसेच मुंबईबाबतचा जो वाद चाललेला होता तो वाद यशवंतराव चव्हाणांनीच मिटविला व मुंबई महाराष्ट्राला घेतली. तसेच खेडेगावातील एखादी व्यक्ती संपूर्ण देशाचा कारभार करू शकते याचा कवीला सार्थ अभिमान आहे. या अभिमानातूनच ही कविता साकार झालेली आहे.

सारांश- रानकवी यशवंतराव तांदळे यांना व्यक्तिचे व्यक्तिचित्रण कसे करावे याचे परिपूर्ण

ज्ञान नव्हते. तरीही त्यांनी उत्स्फुर्ततेपोटी आपल्याला ज्या व्यक्तिबद्दल काय काय वाटते हे त्यांनी वरील कवितेतून वर्णन केलेलेआहे. आपल्या मनात एखाद्या माणसाविषयी वाटणारी माया व आत्मीयता ही त्यांनी 'माझी आई', 'माझी बायकू' व 'जन्मभूमी नामदार यशवंतराव चव्हाण' या कवितेत केली आहे. 'माझी आई' या कवितेत आईचा मोठेपणा वर्णन केला आहे. आपल्या आईच्या आशीर्वादामुळेच आपण हे काव्य करू शकलो हे श्रेष्ठत्व कवीने आपल्या आईला दिले आहे. 'माझी बायकू' या कवितेतून आजच्या काळातील नवरा-बायको कसे जीवन जगतात, आपल्या नात्यातील कोणाविषयीच त्यांना आपुलकी वाटत नाही. हे आजच्या तरूण नवरा-बायकोचे वर्णन आहे. 'जन्मभूमी नामदार यशवंतराव चव्हाण' या कवितेत कवीने यशवंतराव चव्हाणांची थोरवी गायलेली आहे. देवराष्ट्रे नावाच्या खेडेगावातील गरीब घराण्यातील एक व्यक्ती संपूर्ण देशाच्या उच्च पदावर जावू शकते. मुंबईसारख्या मोठया शहराचा वाद मिटवू शकते. म्हणजेच ते आज श्रेष्ठ आहेत. असे कवीला म्हणावयाचे आहे. थोडक्यात कवी हा आपल्या घरातील व्यक्तीपासून ते राजकारणी व्यक्तीपर्यंतचे चित्रण अगदी साध्या सोप्या भाषेत वर्णन करू शकतो व त्यांना मानाचे स्थान देतो.

**यशवंत तांदळे यांची उपहास व उपरोधात्मक कविता**

रानकवी यशवंत तांदळे यांच्या कवितेचा आणखी एक प्रकार पहावयास मिळतो तो म्हणजे उपहास व उपरोधात्मक कविता हा होय. ही कविता म्हणजे 'चारी सबाद सारखं' ही होय.

'चारी सबाद सारखं' या कवितेमध्ये ग्रामीण जीवनाशी ग्रामीण भागात आलुते-बलुतेदार हे कसे एकमेकांशी निगडीत असतात याचे वर्णन आहे. तसेच या सर्वांशी काही अंशी भटक्या लोकांचाही संबंध येतो. तसेच नोकरवर्गाचाही सर्वांशी संबंध येतो.

डेपो मॅनेजर रेकॉर्ड चांगलं ठेवतो. चेकर आपले तपासण्याचे काम चांगले करतो. ड्रायव्हर आपल्या वहानाचे चाक व्यवस्थित फिरवीत असतो. कंडक्टर तिकीटांना व्यवस्थित होल पाडून तिकिट देत असतो. पोलीस छापे टाकीत असतो. फौजदार गुन्हे शोधत असतो. वकिल वकीलकी करून धन म्हणजे भरपूर पैसे मिळवित असतो. पोस्टमन हा प्रत्येकाच्या, ज्याचे पत्र असेल त्यांचे पत्र घरी नेऊन देत असतो. तलाठी खातेउतारे व्यवस्थित लिहित असतो. फडणीस खरे बोलतो, न्यायाधीश योग्य न्याय देत असतो म्हणून त्याचा अधिकार थोर आहे. प्रांत हा शहाणा असतो. मामलेदारांना मोठा मान असतो. वकील वकीलकीचे पैसे

स्वत: मागत नाही तर तो आपल्या कारकूनाकडून पैसे मागतो. असे नोकरवर्गाचे चित्रण कवीने केले आहे.

वरील कवितेत ज्या नोकरवर्गाचे वर्णन केलेले आहे ते प्रामाणिकपणे काम करीत नाहीत. एखाद्याने गुन्हा करावयाचा. पोलीसांनी त्यांना पकडावयाचे. फौजदारांनी त्यांना कैद करावयाचे. वकील त्याला निर्दोष सोडवितो. पोस्टमन मात्र प्रामाणिकपणे काम करतो. आजचा तलाठी कामे कसे करतो? व त्यातून मामलेदार कसा सोडवितो. यातून ही काही कमी जास्त झाले, दगा फटका झाला तर आजचा न्यायाधीश कसा न्याय देतो हे माहीतच आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ज्या स्वातंत्र्यवीरांनी कष्ट घेतले. स्वातंत्र्यानंतर सर्वांना चांगले दिवस येतील अशी आशा होती. परंतु ते आज साध्य झाले का? हे कामकाज व्यवस्थित चाललेले नाही. यामध्ये सुधारणा व्हावी असे कवीला वाटते.

'आजचं कलियुग' या कवितेतही उपहास व उपरोध मांडलेला आहे. भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ मानली जाते. आपल्या नात्यागोत्यातील व्यक्तींना कोणत्याप्रकारे मान द्यावा हे अलिखित ठरलेले आहे. परंतु आज तसे पहावयास मिळत नाही. आजच्या या कलियुगामध्ये कोणीच कोणाला मानत नाहीत. हा झालेला फरक कवीने मांडलेला आहे.

सारांश या दोन्ही कवितेतून कवीला हे सुचवावयाचे आहे की नोकरवर्ग हा प्रामाणिकपणे काम करीत नाही. तो प्रत्येकवेळी अडीअडचणी आणीत असतो. तरी त्यांनी ही प्रवृत्ती बदलावी व प्राम्माणिकपणे सर्वांनी काम करावे. तसेच आजच्या या कलियुगामध्ये कुटुंबातील व्यक्तीने प्रत्येकाने मानाने व आपुलकीने वागावे. हे सर्व बदलले पाहिजे पण ते लवकरात लवकर बदलेल असे वाटत नाही.

**यशवंत तांदळे यांची कूट रचना**

रानकवी यशवंत तांदळे यांच्या कवितेत एक वेगळाच अविष्कार पहावयास मिळतो. तो म्हणजे कूट रचना हा होय. यशवंत तांदळे यांनी कविता रचनेला या प्रकारापासूनच सुरूवात केली असे म्हणावे लागेल. ग्रामीण भागामध्ये हुमान घालणे (ओळखा पाहू) असा प्रकार पहावयास मिळतो. तोच प्रकार यांनी आपल्या कविता रचनेत आणला आहे.

जाना (ओळखा) ही कविता म्हणजे काही कोडी आहेत. यामधून रानकवी यशवंत तांदळे यांची प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि सूक्ष्म निरिक्षणक्षमता प्रत्ययाला येते. कवी सुरूवातीला विचारतो,'

कोनाला सहा पाय? कोनाला तीन पाय?

कोनाला एक पाय जाना ग?

मुंगळयाला सहा पाय,

वावडीला तीन पाय,

भिंगरीला एक पाय ग जाना।[32]

असे पहिल्या तीन ओळीत प्रश्न व पुढच्या तीन ओळीत त्याची उत्तरे दिलेली आहेत. असे या कवितेत एकूण 24 प्रश्न विचारलेले आहेत.

'कोणाला सहा डोळे? कोणाला तीन डोळे? कोणाला एक डोळा ग जाना? तर पण्याला (बासरीला) सहा डोळे, नारळाला तीन डोळे, व सुईला एक डोळा.,

'कोणाला केस नाही?, कोणाला देठ नाही?, कोणाल फूल नाही? , तर तळहाताला केस नाही, मिठाला देठ नाही, व लसणाला फुल नाही, याचे हे उत्तर

'कोणाल शिंग नाही?, कोणाला शेपूट नाही?, कोणाल पाट नाही?, तर घोडयाला शिंग नाही, बेडकाला शेपूट नाही व उंटाला पाट नाही.

'कोणाला पाय नाही?, कोणाला थान नाही?, कोणाला डोके नाही?', तर सापाला पाय नाही, कोंबडीला थान नाही व खेकडयाला डोके नाही.

'कोणाला बांधते?, कोणाला सोडते?, कोणाला धरून ओढते?, तर गायीला बांधते, वासराला सोडते व थानाला धरून ओढते.

'खाली काय ठेवले?, वरून काय ओतले?, कोणाला धरून नाचते?, तर खाली डेरा ठेवला आहे, वरून त्यात दही ओतते आहे, दही घुसळण्यासाठी रवीला धरून घुसळते.

कोणाला खांब नाही?, कोणाला झाकण नाही?, कोणाला हाड नाही?, तर आकाशाला खांब नाही, नदीला झाकण नाही, व जिभेला हाड नाही.

अशाप्रकारे त्यांनी एकंदरीत या कवितेतून 24 प्रश्नांची (गुढाची) उकल केली आहे. रोजच्या व्यवहारातील जीवनातील सर्व गोष्टी आपणाला माहीत असतात. परंतु याच गोष्टी विचारण्याची एक

वेगळीच पद्घती कवीने आपल्या कवितेत मांडली आहे. ही वैशिष्टयपूर्ण काव्यरचना झालेली आहे.

सारांश रानकवी यशवंत तांदळे यांच्या काव्यरचनेमध्ये वेगवेगळे प्रकार दिसून येतात.

सामाजिक कवितेमध्ये फॅशनमुळे समाजाचे होणारे बदल, व्यसनामुळे संसाराची होणारी दुर्दशा, महागाईमुळे सर्वसामान्य लोकांचे होणारे हाल याचे वर्णन आले आहे. तसेच कुटुंबनियोजनामुळे घरामध्ये लोकांची संख्या मर्यादित राहून जीवन सुखाने जगता येते. मुल जन्मल्यानंतर घरातील लोकांना होणारा आनंद इ.चे वर्णन कवीने सूक्ष्मपणे केले आहे. '-हाट ' या कवितेत रहाटावर सूत कातताना त्यावरती स्त्रिया गीत गातात. या गीतामधून आपल्या समाजातील व नात्यागोत्यातील व्यक्तिचा गुणगौरव गातात इ. विचार व गोष्टी या सामाजिक कवितेमधून पहावयास मिळतात.

ग्रामीण कवितेतून जुना शेतकरी व नवा शेतकरी यांच्यातील फरक मांडलेला आहे. नवीन शेतकरी हा शेतीविषयक शिक्षण घेऊन शेतामध्ये थोडया कष्टात जास्त पीक काढू शकतो हा विचार मांडलेला आहे. तसेच ओसाड भागातील माळरानाचे नंदनवन करता येते हे 'किर्लोस्करवाडी' या कवितेत पहावयास मिळते. तसेच 'चारी सबाद सारखं' या कवितेत तर प्रत्येक अलुतेदार व बलुतेदार हा कोणता ना कोणता व्यवसाय करतो, तो ग्रामीणतेशी कसा निगडीत असतो व प्रत्येकजण एकमेकाच्या उपयोगाला कसा पडतो हे ग्रामीण कवितेतून पहावयास मिळते.

निसर्ग हा तर कवीचा सगा सोयराच आहे. निसर्ग हा कधीच एकसारखा नसतो हे त्यांनी निसर्गकवितेत वर्णन केले आहे. कोरडया दुष्काळामुळे होणारे सर्वांचे हाल, ओल्या दुष्काळामुळे होणारे हाल, पाऊस जास्त पडल्यामुळे नदीला पूर येतात. त्यामुळे नदीकाठच्या लोकांचे होणारे हाल, पीक चांगले आल्यावर त्यावर इझाळा पडतो त्यामुळे पीक येत नाही. तर काहीवेळा मीजमाशीच ज्वारीच्या फुलवऱ्यावर बसून ज्वारीचे दाणेच नाहीसे करते. मीजमाशीचे वर्णन सुक्ष्मपणे केले आहे इ. निसर्ग कवितामधून निसर्गाचे अंतरंग व बहिरंग वर्णन केलेले आहेत.

राजकीय क्षेत्रातही कवीचे सूक्ष्मपणे लक्ष आहे हे त्यांच्या '1975 ची आणीबाणी' व '20 कलमीचा फायदा' या कवितेतून पहावयास मिळते. जनतेच्या हिताच्या व फायदयाच्या गोष्टी सरकार राबवत असते हे सर्वांना पटवून देण्याचे काम राजकीय कवितेतून केले आहे.

व्यक्तिविषयक कविता रचनेतून 'आईची माया' व'माझी बायकू' या दोघीमधील आईची मायाच श्रेष्ठ आहे हे सांगितलेले आहे. तसेच 'जन्मभूमी नामदार यशवंतराव चव्हाण' या कवितेतून यशवंतराव चव्हाण हे ग्रामीण भागात जन्मले असून त्यांनी देशाचा राज्यकारभार केला व 'मुंबई' चा प्रश्न सोडविला. ही व्यक्ती इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे, अशाप्रकारचे वर्णन व्यक्तिविषयक कवितेतून मांडले आहे.

उपरोध व उपहासात्मक कवितेतून एक वेगळा विचार मांडलेला आहे. ग्रामीण संस्कृतीमध्ये कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला मानाचे स्थान होते. परंतु आज हे चित्र बदललेले आहे. कोणीच कोणास मानत नाहीत. जो तो स्वतःपुरताच विचार करतो हे कवीने 'आजचे कलियुग' या कवितेत सांगितलेले आहे. ग्रामीण भागातील लोकांचा संबंध हा नोकरवर्गाशी येत असतो. व तो नोकरवर्ग जनतेला कसा त्रास देत असतो, त्या नोकर वर्गाचे कर्तव्य काय? त्यांनी आपल्या नोकरीच्या नियमाप्रमाणे गेले पाहिजे. हा विचार नोकरवर्ग करीत नाही. हा विचार उपरोध व उपहासात्मक विचार कवितेत मांडला आहे.

तसेच ग्रामीण भागामध्ये हुमान घालणे (ओळखा पाहू) हा काव्यप्रकार पहावयास मिळतो याच प्रकारास 'कूट रचना' असे म्हटले जाते. व याच प्रकारास कवी 'जाना' असे म्हणतो. म्हणजे या कवितेमध्ये सर्वांच्या जीवनात रोजच्या व्यवहारातील वेगवेगळया गोष्टी पहावयास मिळतात. पण त्याला वेगवेगळया नावाने कसे ओळखले जाते. त्याबाबतचे प्रश्न विचारणे व त्याची उत्तरे शोधणे हे यामध्ये आहे. हा काव्यप्रकार कोणत्याही कवीच्या काव्यात पहावयास मिळत नाही. म्हणूनच याला कूट रचना असे म्हटले आहे.

रानकवी यशवंत तांदळे यांच्या कविता ह्या उत्स्फुर्ततेतून निर्माण झालेल्या आहेत. त्यांची उपलब्ध कविता संख्या ही कमी असली तरी गुणात्मक दृष्टया यांच्या कविता श्रेष्ठ दर्जाच्या आहेत. तसेच त्या मौखिक अविष्कारातून निर्माण झालेल्या आहेत. म्हणून 'मीजमाशी' यासारख्या कवितेने यशवंत तांदळे यांना रानकवी हा किताब मिळवून दिला.

**यशवंत तांदळे यांची काव्यशैली**

रानकवी यशवंत तांदळे यांच्या काव्यशैलीचा विचार करीत असताना त्यांच्या काव्याची विविध वैशिष्टये व अभिव्यक्तीच्या तऱ्हा पहाणे गरजेचे आहे. त्यांची कविता ही ग्रामीण ढंगाची आहे. तिच्यातील अलंकार, ग्रामीणत्व, लोकतत्त्व, कवितेची भाषा, काव्यातील वास्तवता, राष्ट्रीयवृत्ती, विनोदी वृत्ती, उपहास व उपरोध, तिच्या चाली इ. बाबी पहावयास मिळतात.

तसेच त्यांच्या अभिव्यक्तीच्या त-हा 'उत्स्फुर्तता', 'आव्हानात्मकता', 'निवेदनाचा परिणामकता' 'नाटयात्मकता', 'विनोद निर्मिती', 'लोकगीताची बैठक', 'लोकमानसाला भिडण्याचा प्रयत्न', इ. त-हा पहावयास मिळतात.

रानकवी यशवंत तांदळे यांची संपूर्ण कविता ग्रामीणतेत न्हाऊन निघते. त्यांनी आपल्या काव्यरचनेत ग्रामीण शब्द जसेच्या तसे घेतलेले आहेत, 'राजा शेतकरी' या कवितेत 'हीर', 'दावण', 'न्यार', 'श्यात', 'जुंधळा', 'पैरण', 'घरूधर', 'नवा शेतकरी' या कवितेत 'न्यारी', 'घिऊन', आईची माया या कवितेत 'घितीस', 'ध्यान', माझी बायकू या कवितेत 'आयकू', 'भन', फॅशनवाला या कवितेत 'त्याल', व्यसनी स्त्रियांना संदेश या कवितेत'आया बहिणीनो', 72 चा दुष्काळ या कवितेत 'न्हाई', 'न्हान', 'हाजरी', 'पायजे', 'वरषाचं', 'प्वॉर', 'योल', 'टकूर', इ. दुष्काळातील बायकांचे हाल या कवितेत 'अवदा', 'म्या', 1974चा दुष्काळ या कवितेत 'चिक्कार', 'हायब्रेड', 1975 ची मीजमाशी या कवितेत 'न्यारा', 'परकार', 'हुईल', 1975 ची आणीबाणी या कवितेत 'बोलू', 20 कलमी कार्यक्रम या कवितेत 'सुई', 1976 चा महापूर या कवितेत 'पानी', 'मुजल्याला', 'लय', 1977 चा ओला दुष्काळ या कवितेत 'जुंधळा', 'औंदा', 'इकाय', 'इकून', 'साकऱ्या', 'आबरू', 'पंदरा', इ. दारू पेणाराच हाल या कवितेत 'पेनाराच', 'प्याऽला', 'जर्मली', 'थाटली', 'हागून', 'वंकून', 'आबरू', 'इल'. कुटुंब नियोजन या कवितेत 'नाय', 'बास', 'रासनच'. आजच कलियुग या कवितेत 'फंचीचा', 'निऊन', 'सपरात', 'नकं', 'त्वांड', 'परकार', जाना (ओळखा) या कवितेत 'जाना', 'वावडी', 'नाय', 'हुई', चारी सबाद सारखं या कवितेत 'कुनबी', 'बामन', 'दाडी', 'लव्हार', 'व्हलार', 'व्हान', 'खतूया', 'गुन', 'हिंडतू', घरूधर', 'लिवतो', 'शहाना', 'लगनाचा', 'म्होर', 'इनीत', 'हुता', इ. '-हाट' या कवितेत '-हाट', 'डोसक', 'मुसक', 'तान्हं', 'शेंबूड', 'कुंडात', . किर्लोस्करवाडी या कवितेत 'लिंगुड', 'कुंदा', 'प्वॉर', 'हायती', इ. ग्रामीण शब्द त्यांच्या उपलब्ध कवितेत पहावयास मिळतात. या ग्रामीण शब्द रचनेतूनच त्यांची कविता संपन्न झाली आहे. त्यांच्या कवितेतील ग्रामीणत्व जनमानसाच्या मनाला आणि त्याच्या काळजाला जावून भिडणारे आहे. त्यांच्या सर्वच कवितामधून ग्रामीण प्रतिमा व ग्रामीण शब्दरचना पहावयास मिळतात.

अलंकारिक भाषा - यशवंत तांदळे यांची कविता ग्रामीण आहे. ती क्लिष्टतेत गुंतलेली

नाही. अत्यंत साधेसाधे शब्द त्यांनी आपल्या काव्यात आणलेले आहेत. त्यामुळे त्या काव्यरचनेला अलंकारिकपणाचा साज चढलेला आहे. त्याच्या सर्वच कवितेत ओळीच्या शेवटी एकच वर्ण आलेला पहावयास मिळतो. त्यामुळे यमक अलंकारानी ती कविता भरून आली आहे. राजा शेतकरी या कवितेतील,

'करी पेरणी घातीवर,

मातीचा शालू बीजावर'.

या काव्यपंक्तीतून उपमा हा अलंकार साधलेला आहे. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास '1975 ची मीजमाशी' या कवितेती ओळींचे देता येईल,.

"करतो विनंती व धनगर,

चित्त द्यावे माझ्या शब्दावर,

मीजमाशीचा व न्यारा परकार,

पडतोय इसाळा जुंधळयावर,

मागास हायब्रीड खाल्लय सार,

माशी येऊन वर्ष झाली चार,

खाती दाने दाने सार,

कसा शेतकरी निघल वर ?"[33]

तसेच आईची माया या कवितेतही उपमा अलंकाराचा वापर केला आहे,

"जसा आभाळाला अंत नाही,

तसा मायेला अंत नाही"[34]

सर्व कवितेत त्यांनी यमक अलंकार वापरलेला आहे. त्यामुळे तिला गेयता व श्रवणीयता प्राप्त झाली आहे. तसेच 'जाना' या कवितेत 'सुईचा डोळा, भिंगरीचा पाय, तळहाताचा केस, कोंबडीच थान, खेकडयाची डुई, इ. सारख्या शब्द रचनेतून अतिशयोक्ती हा अलंकार साधलेला आहे. देशात दारूबंदी कायदा केला परंतु पोलीस खाते हप्ते घेऊन हातभट्टीचा धंदा करावयास परवानगी देते ते पुढील काव्यरचनेतून पहावयास मिळते.

"दारूबंदी केली देशाला,

हातभट्टीचा फायदा झाला,

दिल हाप्त बांधून पोलीसाला,

कसा इल कायदा आमलाला "[35]

वरील ओळी या 'दारू पेनाराच हाल' या कवितेतील असून त्यामध्ये वास्तवता जशीच्या तशी उमटलेली आहे. ही काव्यरचना यमक अलंकारात मोडत आहे. त्यामुळे त्यांची कविता ही गेयताबद्ध झालेली आहे. तसेच त्यातील परखडपणाही दिसून येतो.

**लोकतत्व**

रानकवी यशवंत तांदळे यांच्या कवितेत लोकतत्व ही पहावयास मिळते. त्यांच्या कवितांना लोकतत्वाचा साज आहे. ग्रामीण जीवनातील लोकांचा लोकतत्व हा आत्मा आहे. लोकांच्यासाठीच कविता हे तिचे वैशिष्ट्य आहे. उदा.'पाळणा', 'चारी सबाद सारख', 'आईची माया', या कवितेची उदाहरणे देता येतील.

मुल जन्मल्यानंतर मुलांच्या नातेवाईकांना झालेला आनंद 'पाळणा' या लोकगीतातून व्यक्त केला आहे.मुल जन्मल्यानंतर 12 व्या दिवशी मुलाचे नाव ठेवण्याचा कार्यक्रम असतो. ते खालील कवितेतून पहावयास मिळते.

"बाराव्या दिवशी ठेवती नाव

पांडुरंगाला खेळाया न्यावं.[36]

जो बाळा जो जो रे "

असे हे मुलाच्या गुणाचे कौतुकाचे वर्णन करतात. 'आईची माया' या कवितेत आईची थोरवी गायलेली आहे. आईला आपण श्रेष्ठ मानतो म्हणून कवी म्हणतो -

"आईचा आशीरवाद लय मोठा,

कुठल्याही कामात नाही तोटा,

दर्शन घिवून राखूया तिचा मान,

आई मला दे ग तुझ वरदान"[37]

असे ही लोकतत्व त्यांनी आपल्या काव्यरचनेत मांडलेले आहे. 'चारी सबाद सारखं' या कवितेत ग्रामीण भागामध्ये कोणी कोणता व्यवसाय करावयाचा हे ठरलेले असते त्या व्यवसायाबाबत कवी म्हणतो,

"मांग आटीत हुता नाडा,

चांभार शिवित होता जोडा,

सोनार घडवीत होता तोडा,

शिपाई पळवत होता घोडा[38]

वरील प्रकारच्या कवितेतून लोकजीवन, लोकमानस, लोकसंस्कृती, लोकन्याय, व लोकपरंपरेचे भान यांचा विचार केला आहे.

**लोकभाषा**

यशवंत तांदळे यांच्या काव्यरचनेचे वैशिष्टय म्हणजे त्यांनी आपली काव्यरचना लोकभाषेत केली आहे. राजा शेतकरी या कवितेत,

"देशी ऊसाच पीक लय भारी ल्ह्यार

हळद पिकती ही घरूघर".[39]

तसेच "माझी बायकू" या कवितेत

"मला नको भाऊ, तुला नको दीर,

तुझ्या एकटीचाच मला धीर,

माझी बायकू ग माझी बायकू,

तुमी सांगाल तसं आमी आयकू"[40]

असे म्हटले आहे कारण ग्रामीण भागामध्ये पत्नीला बायकूच म्हणून हाक मारतात. तशीच शब्दरचना कवीने केलेली आहे. 'दुष्काळातील बायकाचे हाल' या कवितेत,

"पाऱ्याचा टाक माझ्या,

हिरीचा आटला ग,

म्हणूनच म्या सारा दुष्काळ,

डोक्यावर घेतला ग,

गुरांची चिंता माझ्या ऊरी,

ऊन लागत लय भारी,

रावजी फेका पाटी लवकरी,

येईल अधिकारी "[41]।

अशा प्रकारची काव्यरचना लोकभाषेतून केलेली आहे व ती आपणाला बऱ्याच कवितामधून पहावयास मिळते. कवी रचना करीत असताना कवितेतील भाषा ही कवीची भाषा रहात नाही तर ती लोकभाषा बनते. ती जनमानसाच्या तनामनाशी जवळीक साधते. त्यांच्या कवितेतील लोकभाषा ही जनमानसाच्या काळजाला जाऊन भिडते. म्हणूनच ती जनमानसाची लोकभाषा कवीने आपल्या कवितारचनेत वापरलेली आहे.

**विनोद - उपहास व उपरोध -**

याचाही वापर कवीने आपल्या काव्यरचनेत केला आहे. 'दारू पेनाराच हाल' या कवितेत कवी म्हणतो,

"मला प्याऽला लागते रोज एक बाटली,

दारू पेताना गंमत लई वाटली,

नशेत असताना विजार फाटली,

बायका पोरांना गरीबी भेटली,

मला प्याऽला लागते रोज एक बाटली "[42].

तसेच 'आजच कलियुग' या कवितेतही उपहास व उपरोध पहावयास मिळतो.

"सासू सुनच भांडण लागलं,

सून सासूच्या झिप-या वडं,

पोरगा बापाला मारी व जोडं,

रीत सुटली या कलियुगात,

सासरा धरतो सुनचं हात,

कसा पाऊस पडलं कलियुगात "[43]

काही लोक नोकरीस असतात परंतु आपण कुठे कमी नाही हे दाखविण्यासाठी तें कसे वागतात हे 'फॅशनवाला' या कवितेतून पहावयास मिळते,

"घरतो हळूच हाटीलाची वाट,

जाऊन बसतो खुडचीव थाटात,

हाफ चहाची बघतो वाट[44]"

या काव्यपंक्तिवरून नोकरी करणाऱ्याची आजची अवस्था काय असते हे दिसून येते. तसेच '1972 चा दुष्काळ' या कवितेत तर शेतकऱ्याची हेटाळणीच पहावयास मिळते,

"भांडवलदार हासतो शेतकऱ्याला,

व्यापारी हासतो शेतकऱ्याला,

नोकरदार हासतो शेतकऱ्याला,

शेतकरी भिकारी झाला"[45]

इ. काव्यरचनेतून यशवंत तांदळे यांच्या कवितेत विनोद- उपहास व उपरोध पहावयास मिळतो. तसेच कवीने '1972 सालचा दुष्काळ" या कवितेत कविनेच पुढीलप्रमाणे निवेदन केले आहे ते म्हणतात, "जैसा नंदीबैलवाला घोडयावरन व गाढवावरन पालं घेऊन जातो तसच बघा शेतकऱ्याच हालं झालं होत, रस्त्यातली गावतली लुदभरी कुत्रीसुद्धा त्येला बघून भुंकत होती."[46]

हे निवेदन अगदी बोलके आहे. यातूनही आपणास उपहासाचे चित्रण, पहावयास मिळते.

**लोकगीताच्या चाली**

यशवंत तांदळे यांच्या कविता ह्या लोकगीताच्या चालीवरच आधारित आहेत. त्यांचा जन्म धनगरी कुटूंबात झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या काव्याच्या सादरीकरणासाठी धनगरी वाद्यांचा ठेकाही आहे उदा. 'चारी सबाद सारखं', 'पाळणा', '-हाट' या कवितांना पारंपारिक लोकगीताच्या चाली आहे. तिचा ताल व लय हा एकसारखा आहे. ती आपणाला सहजासहजी गाता येतें. दुष्काळातील 'बायकांचे हाल" या कविता रचनेला सिनेगीताची चाल आहे. "1972 सालचा दुष्काळ" या कवितेत कडव्याच्या शेवटी 'जी ऽऽ जी ऽऽ ' हा सूर

आल्यामुळे तिच्यामध्ये एक प्रकारचा सूर निर्माण झाला आहे. व अधून मधून निवेदनाचा वापर केल्यामुळे तिला नाटयात्मकताही प्राप्त झाली आहे. जरी यामध्ये नाटयात्मकता असली तरीही त्या कवितेत एक सूरच निर्माण झाला आहे. म्हणजेच यशवंत तांदळे यांची कविता ही लोकरंजनातून साकार झालेली आहे. या लोकगीताच्या चालीतून तिला रंजकता प्राप्त झाली आहे.

**शब्दसामर्थ्य**

यशवंत तांदळे यांच्या काव्याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांच्या काव्यातील शब्दचमत्कृती आणि शब्दसामर्थ्य होय. त्यांच्या शब्दांना ग्रामीणतेचा साज आहे. तसेच लोकगीतातून एखादा इंग्रजी शब्दही आलेला आहे. उदा. फॅशन, बॅंक, इरिगेशन, मिसा, मास्तर, मॅनेजर, चेकर, ड्रायव्हर, कंडक्टर, हे शब्द इंग्रजी वाटत असले तरी ते शब्द त्यानी आपल्या स्वतःच्या लकबीने पाहिजे तसे वाकविले आहेत. व लवचिकता प्राप्त करून घेतली आहे. त्यांनी वापरलेले ग्रामीण शब्द तर आपले वेगळेच सामर्थ्य प्रकट करतात. व वरवर वाटणारा सोपा शब्द हा आपल्या काळजाला जाऊन भिडतो. त्यांच्या कवितातील शब्द हे कवितेतील शब्द राहात नाहीत. तर ते वाचक आणि श्रोत्यांना आपलेसे वाटतात. एखाद्याशी हितगूज व्हावे त्याप्रमाणे हे शब्द दवावर टपकताना प्रत्ययाला येतात. त्यांच्या सर्वच कवितेतील शब्द योग्यप्रमाणे वापरले आहेत व शब्दसामर्थ्य प्रकट झालेले आहे.

सारांश यशवंत तांदळे यांच्या कविताची काव्यशैली ही उत्स्फुर्त आहे. या काव्यशैलीला काही पारंपारिक लोकगीतांच्या चालीची मदत लाभली आहे. 'ओवी,' 'पाळणा, पोवाडा, ह्यांच्या चाली वापरल्या आहेत, त्यामुळे ही लोकगीते अत्यंत श्रवणीय झालेली आहेत. त्यामध्ये अलंकारिकपणा, अभिव्यक्तीच्या तऱ्हा, ग्रामीण शब्दरचना, लोकतत्व, लोकभाषा, विनोद- उपहास व उपरोध व शब्दसामर्थ्य यामुळे त्यांची काव्यशैली ही उठावदार झाली आहे. अशा काव्यशैलीमुळे त्याची कविता ही वेगळी वळणे घेऊन आकाराला आली असे म्हणावे लागेल.

**निष्कर्ष :-**

रानकवी यशवंत तांदळे यांची उपलब्ध संख्या कमी असली तरी त्याचे श्रेष्ठत्व वेगळे आहे. एक अशिक्षित मनुष्य शेळया मेंढयाची राखण करता करताच वेगवेगळी दृश्ये पहातो. तीच दृश्ये आपल्या काव्यात चित्रित करतो. त्यांना लोकगीताचा बाज देतो व काव्यात्मकता साधतो. आपली लोकसंस्कृती व समाज यांच्या विसंवाद

साधतो. त्याला हव्या त्या समान व्यवस्थेचे सुतोवाच्च करतो. या गोष्टी तांदळे यांच्याकविता वाचताना जाणवतात. त्यासाठी ते वेगवेगळया प्रकारच्या रचना करतात. या कवितेतून त्यांच्या तरल प्रतिमेचा पुनःप्रत्यय येत राहतो. 'पाळणा' व 'चारी सबाद सारखं' या कविता पारंपारिक वाटत असल्या तरी त्या पूर्णतः वेगळया आहेत. चाल अथवा घाटणी ही मुलतः धनगरी ओवीबंधनातून आली आहे. त्यांच्या काव्यरचनेत कोठेही पाल्हाळ व विस्किळितपणा आलेला नाही. त्यांनी मराठी कवितेत 'कूटरचना' काव्यप्रकार निर्माण केला आहे. यामध्ये सर्व कोडी व त्या कोडयांची उकल केली आहे. कोडी (प्रश्न) आपल्या रोजच्या व्यवहारातीलच परंतु ती प्रश्नरूपाने विचारून उत्तर शोधणे हे त्या प्रकाराचे वेगळेपण आहे. अशा या सर्व कवितातून ग्रामीणतेचा साज पहावयास मिळतो. कवितेची बांधणी करत असताना तेथे कोठेही तडजोड करीत नाहीत. ती उत्स्फुर्त आहे. परिस्थितीजन्य आहे. अल्पाक्षर हे तिचे आणखी एक वैशिष्टय आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की रानकवी यशवंत तांदळे यांची कविता ही अत्यंत गेय आहे ती अक्षरगणवृत्तांनी बद्ध नसली तरी ती यमकबद्ध निश्चितच आहे. त्यामुळे ती श्रोत्यांच्या मनापर्यंत जाऊन पोहोचते. म्हणूनच त्यांना 'मीजमाशी' नावाच्या कवितेने 'रानकवी' हा किताब मिळवून दिला.

* * *

## ** संदर्भ टिपा **

## ** प्रकरण चौथे **


1. दैनिक 'राष्टशक्ती' सांगली दि. 25.7.1976 187
2. तत्रैव कॉलम नं. 2 पृष्ठ क्र. 187
3. तत्रैव कॉलम नं 3 पृष्ठ क्र 187
4. प्रबंधिका परिशिष्ठ क्रमांक 1 कविता क्रमांक 3 पृष्ठ क्रमांक 148
5. उनि कविता क्रमांक 4 , पृष्ठ क्रमांक 149
6. उनि कविता क्रमांक 5 , पृष्ठ क्रमांक 152
7. उनि कविता क्रमांक 6 , पृष्ठ क्रमांक 153
8. उनि कविता क्रमांक 7 , पृष्ठ क्रमांक 154
9. उनि कविता क्रमांक 8 पृष्ठ क्रमांक 156
10. उनि कविता क्रमांक 9, पृष्ठ क्रमांक 157
11. उनि कविता क्रमांक 10 , पृष्ठ क्रमांक 159
12 उनि कविता क्रमांक 11 , पृष्ठ क्रमांक 161
13. उनि कविता क्रमांक 12, पृष्ठ क्र 162
14. तत्रैव पृष्ठ क्रमांक 163
15. उनि कविता क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 164
16. उनि कविता क्रमांक 14, पृष्ठ क्रमांक 166
17. उनि कविता क्रमांक 1, पृष्ठ क्रमांक 142
18. तत्रैव पृष्ठ क्रमांक 144
19. उनि कविता क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 168
20. उनि कविता क्रमांक 16, पृष्ठ क्रमांक 172
21. तत्रैव पृष्ठ क्रमांक 171
22. उनि कविता क्रमांक 17, पृष्ठ क्रमांक 174
23. उनि कविता क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 176
24. उनि कविता क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 179

25. उनि कविता क्रमांक 20, पृष्ठ क्रमांक 181
26. उनि कविता क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 182
27. उनि कविता क्रमांक 22, पृष्ठ क्रमांक 183
28. उनि कविता क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 184
29. तत्रैव पृष्ठ क्रमांक 184
30. उनि कविता क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 185
31. उनि कविता क्रमांक 25, पृष्ठ क्रमांक 186
32. उनि कविता क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 146
33. उनि कविता क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 176
34. उनि कविता क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 184
35. उनि कविता क्रमांक 8, पृष्ठ क्रमांक 155
36. उनि कविता क्रमांक 10, पृष्ठ क्रमांक 159
37. उनि कविता क्रमांक 23, पृष्ठ क्रमांक 184
38. उनि कविता क्रमांक 1, पृष्ठ क्रमांक 139
39. उनि कविता क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 165
40. उनि कविता क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 185
41. उनि कविाता क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 150
42. उनि कविता क्रमांक 8 , पृष्ठ क्रमांक 155
43. उनि कविता क्रमांक 12, पृष्ठ क्रमांक 162
44. उनि कविता क्रमांक 3, पृष्ठ क्रमांक 148
45. उनि कविता क्रमांक 16, पृष्ठ क्रमांक 171
46. तत्रैव पृष्ठ क्रमांक 170

* * *